

# माणूस

२४ फेब्रुवारी ६८ : चालीस पैसे

## पंडित दीनदयाळ

भारतीय राष्ट्रवादाचे वैचारिक शिल्पकार

"माणूस" संचलन विशेषांकास आमच्या हार्दिक शुभेच्छा !

# जांभळी टाकवडे पंचगंगा सह० पाणी पुरवठा मंडळी, लि०

● जांभळी ● ता. शिरोळ ● जि. कोल्हापूर ●

[ रजि नं. के. पी. आर. / जी. एन्. एल्. / १०५ / ता. २७-१२-६३ ]

ऑडिट वर्ग "अ"

| शेअर भांडवल | पाणीपुरवठा क्षेत्र | सभासद |
| --- | --- | --- |
| रु. २,२९,०००·०० | ९०० एकर | ४२८ |

**वैशिष्टचें**

- जांभळी टाकवडेच्या परिसरात पंचगंगेच्या अमृत सिंचनाने संकरीत मका, ज्वारी व भुईमूग इ. पिके घेऊन नमुनेदार शेतीचे प्रात्यक्षिक दाखवून नंदनवन उभी करणारी आदर्श योजना.
- गरीब, मध्यवर्गीय शेतकरी असलेल्या सभासदांच्या ऐक्याच्या व सामुदायिक जोरावर सहकारी तत्वावर आधारित समाजवादाकडे वाटचाल करीत गेली ३ वर्षे आम्ही अन्नधान्य आघाडी मजबूत करण्यासाठी ठामपणे उभे आहोत,
- ग्रामीण जनतेची सर्वांगीण विकास करू पाहणारी योजना.

आत्माराम तायाप्पा राजमाने
मॅनेजर

आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
चेअरमन

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : एकूणचाळीस
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** **फेब्रु. ९**

३१ डिसेंबर, ६७ चा 'माणूस'चा अंक मी वाचला होता. कैलास येथील नानासाहेबांचे भाषणही वाचले होते. पण मजवर याचा विशेष परिणाम झाला नव्हता. माझे लक्षही गेले नव्हते.

पण पंधरा दिवसापूर्वी जेव्हा मी ३१ डिसें. अंक परत वाचला त्या वेळी त्या लेखातून निर्माण होणाऱ्या शक्ती-कडे मात्र माझे मन ओढले गेले व आमचे कुटुंबप्रमुख व नेते श्री. नानासाहेब गोरे यांना मी लिहिले की, १४ मार्च ६८ रोजी परदेशी गव्हाची होळी करण्याचा कार्यक्रम महाराष्ट्रभर संघटित करावा.

ज्याप्रमाणे खादी व स्वदेशी प्रचारासाठी परदेशी कापडाची होळी करण्यात आली व त्याप्रमाणे कार्यक्रम हाती घेण्यात आला होता, तसा हा कार्यक्रम संघटित व्हावा, ही एक चळवळ व्हावी.

या चळवळीच्या ठिणगीमधून वणवा पेटला पाहिजे. तो पेटावा म्हणून 'गोवा विमोचन साहाय्यक' समिती-सारखी एखादी संघटना उभारणे जरुरीचे आहे.

आपल्या 'कैलास ते सिंधुसागर' या स्तुत्य उपक्रमा-बद्दल मनःपूर्व अभिनंदन.

**दत्ता शिंदे, कोल्हापूर**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपण काल्पनिक आहेत.

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

# २ प्रतिपच्चंद्ररेखेव


## एतद्देशप्रसूतस्य........सकाशात........

व्याख्यानाच्या ओघात कॉम्रेड चंद्रगुप्त चौधरी यांनी जेव्हा हा मनुस्मृतीतील श्लोक श्रोत्यांना ऐकवला तेव्हा उपस्थितातील प्रखर राष्ट्रवादीदेखील एकदम भारावून गेला.

कट्टर साम्यवादी हा कट्टर राष्ट्रवादाच्या भावना व्यक्त करीत होता आणि अन्नसंचलनाच्या व्यासपीठाची प्रतिष्ठा उंचावत होती– खुलताबाद दि. २७ जानेवारी १९६८.

कॉम्रेड चंद्रगुप्त चौधरी व त्यांचे ४।५ सहकारी दिवसभर संचलनासोबत असल्याने कसलीच अडचण भासली नाही.





## खुलताबाद ते देवगिरी...

ही वाट तुडवता तुडवता सारखी आठवत होती ती
यादव साम्राज्याची दुर्दैवी अखेर !
' नरदुर्ग 'च पोखरला गेल्यावर या अभेद्य तटबंदीतूनही शत्रूला कशी सहज वाट सापडते !
एरव्ही हा देवगिरीचा दुर्ग कोणालाही अजिंक्यच होता. पण धान्याऐवजी मिठाची पोती किल्ल्यात भरून ठेवण्याइतके आमचे किल्लेदार गाफील ठरले आणि व्यापारी हरामखोर निघाले.
' खूप मोठे सैन्य मागून येत आहे ' ही साधी अफवा प्रचंड यादव साम्राज्याची धुळधाण उडविण्यास पुरेशी ठरली !
त्या बंडखोर शंकरदेव यादवाच्या शरीराची कातडी सोलून त्याचे रक्तबंबाळ प्रेत गिधाडांना खाण्यासाठी देवगिरीच्या वेशीवर टांगून ठेवण्यात आले–
ती वेस ही तर नसेल !



देवगिरीप्रवेश ↑

आणि

ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोरील ओळखीचे

चार शब्द....

संचलनाला सामोरे जाण्यासाठी औरंगाबादहून त्याच दिवशी सकाळी पांच वाजता दहा उत्साही तरुण पायी देवगिरीकडे निघाले. त्यांच्यासमावेत श्री. ग. मा.





## रात्रीची सभा

प्रमुख वक्ते जनसंघाचे
श्री. वसंतराव देशपांडे

‘ पंजाबचा गहू महाराष्ट्रात येऊ शकत नाही. आंध्रचा तांदूळ बंगालला मिळत नाही. अमेरिकेचा लाल गहू मात्र हिंदुस्थानात कुठेही केव्हाही मिळू शकतो, असे का ? ’

हा वसंतरावांचा सवाल बिनतोड होता. देवगिरीच्या ग्रामस्थांना फार दिवसांनी असे वक्तृत्व ऐकायला मिळत होते.

# देवगिरी ते औरंगाबाद : अंतर आठ-नऊ मैल

औरंगाबाद दिसू लागले तशी संचलनाला गती आली, पावले एकसाथ, एक-दोन, एक-दोनच्या ठेक्यात पडू लागली. औरंगाबादच्या 'मिल कॉर्नर'पाशी मंडळी साडेदहाला जमणार आहेत असा निरोप आदल्याच दिवशी मिरासदारांनी देवगिरीला पाठविला होता.
त्यामुळे वेळेवर, अचूक पोचण्याची धडपड होती.

'तुम्ही चालत परगावहून येऊन वेळेवर आलात आणि आमची मंडळी अजून जमताहेत, हे कसं काय बुवा! आम्हाला वाटलं याल अकराच्या बेताला. भलताच व्यवस्थितपणा तुमचा हा!' अनंतराव भालेरावांनी स्वागतात रंग भरला.

स्वागतासाठी जमलेल्या मंडळीत
पुण्याच्या गोखले इन्स्टिटयूटचे संचालक डॉ. वि. म. दांडेकर
शिवाय औरंगाबादमधील विविध पक्षांचे
व विविध थरातले कार्यकर्ते.



## मिल कॉर्नर ते साहित्य परिषद...

संचलन औरंगाबाद शहरातून....



## स्थानिक पत्रकारांसमवेत ↓

दि. २९ जानेवारी दुपारी चार वाजता. 'दैनिक अजिंठा'चे संपादक श्री. ठिपसे, अनंतराव भालेराव, श्री. नावंदर, श्री. अशोक आचार्य आणि मित्रपरिवार.

तास-दीडतास मनमोकळी चर्चा.





## आणि सायंकाळची सभा

औरंगाबादेत निवडणुकांचे धमाल
वातावरण,
तरीही सभेला दाट गर्दी.
औरंगाबादचा तमाम बुद्धिजीवी
वर्ग
दांडेकरांचे भाषण ऐकायला
उत्सुक होता.

वा. ल. कुलकर्णी यांच्यासारखा
तटस्थ साहित्यसमीक्षक
अध्यक्षप ी ोता.

दीड तास सभा डोलत ोती, हसत
होती, चिडत संतापतही होती.
दांडेकरांच्या शब्दातील खोच
आणि बोच श्रोत्यांना अस्वस्थ
करीत होती.

चार दिवस औरंगाबादेत
दांडेकरांच्या भाषणाशिवाय
दुसरा विषय ऐकू येत नव्हता.

माणूस


## ३० जानेवारी

—जाहीर सभेत रिपब्लिकन पक्षाचे श्री. दादासाहेब रूपवते.

मुंबईच्या 'बेस्ट' संपामुळे जॉर्ज फर्नांडिस येऊ शकले नाहीत, पण सभा व्यवस्थित पार पडली. वक्ते नेहमीच्या परिचयाचे होते, पण विषय जिव्हाळ्याचा होता. शिवाय विचारसरणी भिन्न पण व्यासपीठ एक हे दृश्यही नवीन होते.

'आम्ही जात सोडली. पण साऱ्या देशानेच 'जोहार मायबाप'ची वृत्ती उचलली काय अशी शंका येते' इति दादासाहेब रूपवते. 'देश गहाण पडत आहे'— इति अध्यक्ष डॉक्टर बोरकर—मराठवाडा विद्यापीठ, अर्थशास्त्र विभाग प्रमुख. 'देशात अन्नधान्याची तूट आहे ही खोटी गोष्ट आहे' इति कॉम्रेड चंद्रगुप्त चौधरी, शिवाय श्री. गोविंद-भाई श्रॉफ, अनंतराव भालेराव, वसंतराव देशपांडे यांनीही श्रोत्यांच्या अपेक्षा पूर्ण केल्या.





निरोप.

कोण थंडी ! पण मित्रमेळा सकाळी सात वाजता
साहित्य परिषदेपाशी निरोप द्यायला जमला.

प्रा. पंढरीनाथ रानडे, प्रा. देगलूरकर, साटू पिसा कारभारी (अक्राणी), गोविंद देशपांडे, प्रा. दत्ता मिरासदार, श्री. ग. मा., अनंतराव भालेराव, आत्माराम पाटील, राजाभाऊ कुलकर्णी....

एवढ्या थंडीतही कुडकुडत आलेले प्रा. वसंतराव कुंभोजकर
फोटोच्या वेळी नेमके कुठे गडप झाले ?



'संचलन नक्की यशस्वी होणार

भरलेली घागर घेतलेली सुहासिनी समोरून गेली पाहा.'

—सौ. उषाताई वाघमारे आपले अनुभव खणखणीत शब्दात ऐकवण्यासाठी आणि सैनिकांना 'मंगल' निरोप देण्यासाठी सन्मित्र कॉलनीच्या वळणावर अचानक उपस्थित झाल्या.

निरोप घेतले-दिले.

संचलन पुढे निघाले.

नक्षत्रवाडीकडे.

दि. ३१-१-१९६८

# पंडित दीनदयाळ

## एका समर्पित जीवनाचा

गेल्या ११ फेब्रुवारीची गोष्ट. दुपारच्या वेळी कोणी तरी धावत येऊन बातमी सांगितली– 'पं. दीनदयाळ उपाध्याय यांचा खून करण्यात आलेला आहे.' काही क्षण त्या वाक्याचा अर्थबोधच होईना. परंतु हळूहळू मन भानावर आले आणि जे काही कानावर पडेल ते ऐकायची त्याची तयारी झाली. दीनदयाळजी पठाणकोट–सिआल्डा एक्सप्रेसने लखनौहून पाटण्याला चालले होते. रात्रीच्या वेळी मोगलसराई स्टेशनवर पठाणकोट–



# अमानुष अंत

सिआल्डा एक्स्प्रेसचा एक डबा तुफान एक्स्प्रेसला जोडण्यात आला. या डब्याच्या पहिल्या वर्गामध्ये दीनदयाळजी झोपलेले होते आणि यानंतर मध्ये काय घडले हे कोणालाच कळले नाही. पहाटेच्या वेळी मोगलसराई स्टेशनपासून एक-दीड फर्लांग अंतरावर जखमांनी रक्तबंबाळ झालेला एक मृतदेह पोलिसांना आढळला. हा मृतदेह कोणाचा आहे हेही म्हणे प्रथम कळून आले नाही. शेवटी या मृत व्यक्तीचे खिसे तपासले तेव्हा त्यात रिझर्व्हेशन तिकिटावर नाव आढळले — दीनदयाळ उपाध्याय.

मोगलसराई हे काही लहान स्टेशन नव्हे. तेथे सारखी गाड्यांची येजा चालू असते. दीनदयाळजी ज्या डब्यातून प्रवास करीत होते त्या डब्यात कोण केव्हा

शिरले, तेथे काय झाले आणि दीनदयाळजींचा जखमांनी रक्तबंबाळ झालेला मृतदेह एक-दीड फर्लांग अंतरावर नेण्यात येत असताना या निर्घृण प्रकाराची कोणालाच कशी कल्पना आली नाही, हा एक अजब प्रकार म्हणावा लागेल.

दीनदयाळजींचा खून कोणी केला, का केला, यासंबंधीची माहिती जेव्हा केव्हा उपलब्ध होईल तेव्हा यासंबंधी अधिक काही लिहिता बोलता येईल. परंतु आज एवढे निखालस म्हणता येईल की, दीनदयाळजींच्या आकस्मिक आणि अमानुष हत्येमुळे देश एका सच्च्या देशसेवकाला मुकला आहे.

एका समर्पित जीवनाचा अंत झाला आहे.

दीनदयाळजी जनसंघाचे अध्यक्ष होते म्हणून मी हे म्हणतो असे नव्हे. पक्षाचे अध्यक्षपद हे त्यांच्याकडे अवघ्या महिन्या–दीड महिन्यापूर्वी आले होते. तत्पूर्वी त्यांनी जनसंघाच्या सरकार्यवाहपदाची जबाबदारी स्वीकारली होती. गेल्या महिन्या-दीड महिन्यात ते प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात वावरत असले तरी त्यापूर्वी त्यांनी हे झोत कटाक्षाने टाळले होते. भारतमातेची निरपेक्ष उपासना हेच दीनदयाळजींच्या जीवनाचे ध्येय होते.

१० ऑक्टोबर १९१७ रोजी मथुरा जिल्ह्यातील एका मध्यमवर्गीय कुटुंबात कै. उपाध्याय यांचा जन्म झाला. अलाहाबाद येथे शिक्षकाचा पेशा सांभाळत असतानाच ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याकडे ओढले गेले. संघाचे पूर्ण वेळ प्रचारक म्हणून उपाध्याय उत्तर प्रदेशात कार्य करीत होते. कोणत्याही एखाद्या राजकीय पक्षात प्रवेश करून चटकन प्रसिद्धीला यण्याचा आणि त्यायोगे उपलब्ध होणारे लाभ उठविण्याचा दीनदयाळजींचा स्वभाव नव्हता. खेडोपाडी हिंडून समाज-जागरणाचे उपेक्षित परंतु तितकेच आवश्यक असे कार्य करण्यात त्यांच्या मनाला समाधान लाभत होते.

आपण कधीकाळी राजकीय क्षेत्रात पदार्पण करू अशी त्यांना मुळीच कल्पना नव्हती. परंतु १९५१ मध्ये स्वर्गीय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केल्यानंतर श्यामाबाबूंच्या सूचनेनुसार दीनदयाळजींनी जनसंघाच्या उत्तर प्रदेश शाखेचे कार्यवाहपद स्वीकारले. श्यामाबाबूंना दीनदयाळजींचा व्यासंग, संघटनाचातुर्य आणि अभिजात निस्पृहता यांची ओळख असल्यामुळे त्यांनी दीनदयाळजींची पक्षाच्या सरकार्यवाहपदावर नियुक्ती केली. गेली चौदा वर्षे दीनदयाळजी जनसंघाचे सरकार्यवाह म्हणून ओळखले जात होते. प्रारंभीच्या काळात जनसंघाला विविध आक्षेपांना आणि आघातांना तोंड द्यावे लागले. 'जातीय, प्रतिगामी' ही वारंवार वापरून गुळगुळीत झालेली दूषणे वापरून जनसंघाला बदनाम करण्यात कॉंग्रेस, समाजवादी आणि साम्यवादी यांच्यांत चढाओढच लागली होती. जातीय भूत जागे करून त्या आधारे सत्ता हस्तगत करणाऱ्यांनी 'एक निशान, एक विधान, एक प्रधान' अशी निखळ राष्ट्रवादी भूमिका घेणाऱ्या जनसंघावर बेताल आरोप

करावेत यात अनपेक्षित असे काहीही नव्हते. जनसंघासंबंधी दोनचार कटू शब्द बोलल्याखेरीज पं. नेहरूंच्या भाषणाची पूर्तता होत नसे असा हा काळ होता. अशा या विकट परिस्थितीत आपल्या अंत:करणातील ध्येयवादाचा नंदादीप तेवत ठेवायचा, त्याची प्रभा वाढविण्याचा प्रयत्न करायचा, ही गोष्ट सोपी नव्हती. परंतु श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या आदेशानुसार दीनदयाळजींनी हे जे कार्य हाती घेतले ते जीवनाचा अमानुष अंत होईपर्यंत चालू ठेवले होते.

## वैचारिक बाजू

दीनदयाळजी बोलघेवडे देशसेवक नव्हते. आणि त्यामुळेच श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या निधनानंतर जनसंघाच्या विशुद्ध राष्ट्रवादाचे रोपटे या भूमीत मूळ धरावे, फुलावे, बहरावे यासाठी ज्या कार्यकर्त्यांनी आपला जीवनाचा क्षण अन् क्षण आणि शक्तीचा कण अन् कण खर्चीला त्यात दीनदयाळजींचे स्थान वरचे होते. १९५२-मध्ये भारतात पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. जनसंघही त्या निवडणुकीत उतरला होता. परंतु त्या वेळी त्या पक्षाला फारसे यश लाभले नाही. गेल्या वर्षी चौथ्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून जनसंघाला मते मिळाली. अवघ्या पंधरा वर्षांच्या अवधीमध्ये जनसंघाने भारतीय जनमानसांत हे जे स्थान मिळविले त्याला दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी बाजपेयी, बलराज मधोक, यज्ञदत्त शर्मा प्रभृति नेत्यांचे श्रम कारणीभूत झाले आहेत. ज्या वेळी इतर पक्ष अंतर्गत वैचारिक मतभेदांनी खचून गेलेले आहेत, त्या वेळी जनसंघाचे एक-संघी स्वरूप अधिकच दृढ झाले, या मागे दीनदयाळजींसारख्या निस्वार्थी राष्ट्रसेव-काची अहर्निश तपस्या उभी आहे.

दीनदयाळजींचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे ते केवळ कार्यकर्ते नव्हते. व्यासंगी आणि तत्त्वचिंतक विचारवंत म्हणूनही त्यांचे स्थान मोठे आहे. किंबहुना जन-संघाच्या वैचारिक भूमिकेचे शिल्पकार या बिरुदावलीवर त्यांचाच रास्त अधिकार पोचतो. जनसंघाला आर्थिक धोरण नाही किंवा असलेच तर ते प्रतिगामी आहे असा आरोप करणाऱ्यांसाठी दीनदयाळजींनी ' भारतीय अर्थनीति-विकास की एक दिशा ' या नावाचा प्रबंध लिहिलेला आहे. या प्रबंधात त्यांनी असे लिहिले आहे की, ' राष्ट्रीय सुरक्षितता, सर्वांना रोजगार, जीवनावश्यक वस्तूंचे न्याय्य वाटप आणि उद्योग-व्यवसायांचे विकेंद्रीकरण हा आमच्या आर्थिक कार्यक्रमाचा आधार असला पाहिजे. '

आपले नियोजन का फसले यासंबंधीही उपाध्याय यांनी या प्रबंधात आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात– ' भारतीय परिस्थितीचा विचार न करता योजना आखण्यात आल्या. हा आपल्या नियोजनाचा मुख्य दोष आहे. भारतातील उपलब्ध साधनसंपत्ती आणि भारतीय जनतेच्या गरजा यांच्याकडे लक्ष न देता आपल्या नियोजनकारांनी रशिया आणि यूरोप यांचे अंधानुकरण करण्याचा दुबळा

प्रयत्न केला. रशिया काय किंवा अन्य युरोपीय देश काय – औद्योगीकरणाच्या प्रारंभावस्थेत त्या देशांना कोणत्या आडचणींना तोंड द्यावे लागले याकडे लक्ष देण्याचीही नियोजनकारांना गरज भासली नाही. निरनिराळे उद्योगधंदे आणि विभाग यांच्या विकासात जो एक समतोल साधणे आवश्यक असते त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. कोणत्याही योजनेच्या कार्यवाहीसाठी केवळ पैसा असून भागत नाही. भौतिक आणि मानवी साधनांचाही विचार व्हावयास हवा असतो. योजनेसाठी पैसा कसा उपलब्ध करायचा एवढी विवंचना बाळगून नियोजनकारांची धडपड सुरू होते. भारतात कोणत्या गोष्टीची उभारणी आवश्यक आहे, कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यावयाचे याचा विचार केला न गेल्याने परदेशांकडून मिळालेला पैसा खर्च झाला, परंतु त्या प्रमाणात राष्ट्रीय संपत्तीत भर पडू शकली नाही. मानवाच्या विकासाऐवजी भौतिक प्रगती हेच आमचे उद्दिष्ट झाले आणि त्यामुळे तीन योजना राबवूनही त्यांचा फायदा सामान्य जनांपर्यंत पोचू शकला नाही.'

## स्वावलंबनाची गरज

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वीस वर्षांची वाटचाल होऊनही आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने आपण अपेक्षित प्रगती करू शकलो नाही, याबद्दल दीनदयाळजींसारख्या राष्ट्रवादी विचारवंताला खेद होणे साहजिकच होते. स्वावलंबी झाल्याशिवाय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होत नाही हे सांगताना ते म्हणतात–'आर्थिक क्षेत्रात स्वावलंबी होणे ही आमची प्रमुख गरज आहे. जर आम्ही परदेशी पशावर अवलंबून राहणार असू तर मदत देणारी राष्ट्रे आपल्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दडपणे आणणार हे आपण ओळखले पाहिजे. नकळत आपण सहायकारी राष्ट्रांच्या कह्यात ओढले जाऊ. दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची ज्या राष्ट्राला शरम वाटत नाही त्या राष्ट्राचा स्वाभिमान नष्ट होतो आणि परिणामत: अशा स्वाभिमान्यशून्य राष्ट्राला आपले स्वातंत्र्यही टिकवता येत नाही.'

बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात नवनवे विचार येत असले आणि ते आपण ग्रहण करणे अवश्यक असले, तरी हे विचार आत्मसात करताना आपली मूळ भारतीय प्रवृत्ति सोडता कामा नये, हा दीनदयाळजींचा आग्रह किती वाजवी आहे, हे आज अन्नधान्यासाठी आपल्याला परकीय राष्ट्रांची आराधना करताना राष्ट्रीय स्वाभिमानाची जी किंमत द्यावी लागत आहे त्यावरून प्रतीत होते.'

'भारतीय अर्थनीति' याप्रमाणेच 'राष्ट्रजीवनकी समस्याएँ' हे दीनदयाळजींचे दुसरे पुस्तकही जनसंघाच्या राष्ट्रवादी भूमिकेचे प्रतिपादन समजावून घेण्यास उपयुक्त ठरते. समाजवाद मानवाच्या प्रतिष्ठेवर आघात करतो म्हणून त्याला आपला विरोध आहे असे सांगून दीनदयाळजी लिहितात– 'धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांवर आधारलेला हिंदू जीवनादर्शच आपल्याला आजच्या सर्व संकटांतून तारून नेण्यास समर्थ आहे. आज जगाला भेडसावत असलेल्या प्रश्नांवर समाजवाद

हा तोडगा नव्हे ! हिंदुत्ववादानेच ते प्रश्न सुटू शकतील. कारण हिंदु तत्त्वज्ञान जीवनाच्या विविध अंगांचा पृथक् विचार न करता समग्र जीवन अविभाज्य मानून या संपूर्ण जीवनाचे सर्वंकश ध्येय कोणते असू शकते याचा आमच्या दार्शनिकांनी अभ्यास केलेला आहे. जेव्हा आम्ही हिंदुजीवनादर्शाचा विचार करतो तेव्हा त्यातील निष्प्राण कर्मकांडालाही आम्ही मानतो असा कोणीही गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. परिस्थितीच्या ओघात ज्या रूढी व जे विचार कालबाह्य ठरले असतील ते त्याज्यच मानायला हवेत. हा विवेक आमच्यापाशीही आहे. परंतु हिंदुत्व म्हणजे विज्ञानविरोधी आहे अशी जी एक चुकीची समजूत प्रचलित झाली आहे तिचेही निराकरण केले पाहिजे. आमच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाशी सुसंगत ठरेल अशा दृष्टीने विज्ञानाचा व यंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात संकोच वाटायचे काहीच कारण नाही. महात्मा गांधींच्या विचारपरंपरेनुसार विनोबाजी, जयप्रकाश नारायण आणि राजगोपालाचार्य यांनी विश्वस्त-व्यवस्थेची (ट्रस्टीशिप) कल्पना पुढे मांडली आहे. ती हिंदुजीवनपद्धतीशी सुसंगत आहे. हा एक विचार असा आहे की, जो समाजवादी आणि समाजवादीतर अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांना खचित उपयोगी ठरेल. जर आम्ही पाश्चिमात्य विचारप्रणालीचे अंधानुकरण करण्यात मग्न राहिलो तर समाजवाद काय किंवा सर्वोदयवाद काय, यांपैकी कोणीही आपल्या सांस्कृतिक विशेषांचे संरक्षण करू शकणार नाही आणि आमच्या पुढील प्रश्नांचाही निकाल होणार नाही. आज जगापुढे जे विविध वैचारिक संघर्ष निर्माण झाले आहेत त्या सर्व संघर्षांवर मात करून भारतीय परंपरा टिकवू शकणारा ध्येयवाद आमच्या मनात दृढमूल व्हावयास हवा. मग त्याला तुम्ही हिंदुत्ववाद म्हणा नाही तर मानवतावाद म्हणा किंवा दुसरे कोणतेही नाव द्या. भारतीय जनतेमध्ये उत्साहाचे नवे वातावरण निर्माण करायचे असेल तर भारताच्या आत्म्याची उपेक्षा करून चालणार नाही. कदाचित असेही होईल की हाच जीवनादर्श आजच्या मांबावलेल्या जगाला देखील मार्गदर्शन करू शकेल.'

जनसंघाचे वैचारिक अधिष्ठान ग्रंथरूपाने लोकांसमोर यावे यासाठी कै. उपाध्याय यांनी १९६५ मध्ये विजयवाडा येथे भरलेल्या जनसंघाच्या अधिवेशनात एकात्म मानवतावादासंबंधीचा आपला प्रबंध मांडला होता. या संबंधात भारतीय जनसंघ कोणती मूल्ये मानतो याचे त्यांनी सूत्ररूपाने विवेचन केले आहे. विजयवाडा अधिवेशन आटोपून दीनदयाळजी मुंबईला आले असताना त्यांनी चार व्याख्याने देऊन आपले वैचारिक अधिष्ठान स्पष्ट केले. आपण आपले स्वत्व विसरून गेलो असल्यामुळे आज देशात फुटीर प्रवृत्ती जोम धरू लागल्या आहेत आणि या प्रवृत्तींना वेळीच आळा घातला नाही तर भारताचे आजचे मानचित्र भंगण्याचा धोका निर्माण होईल असाही दीनदयाळजींनी इशारा दिला. ते म्हणाले, "It is essential that we think about our national identity. Without

this identity, there is no meaning of independence, nor can independence become the instrument of progress and happiness. As long as we are unaware of our national identity, we cannot recognise or develop all our potentialities. The basic cause of the problems facing Bharat is the neglect of its national identity. "

## तत्त्वचिंतक

भारतीय स्वत्वाची ओळख पटल्याशिवाय देशापुढील विविध प्रश्नांवर आपल्याला उपाय योजता येणार नाहीत हा दीनदयाळजींनी तीन वर्षांपूर्वी दिलेला इशारा किती खरा ठरला आहे, हे आज देशात सर्वत्र हिंसेचे अनाचार थैमान सुरू झाले आहेत त्यावरून दिसून येते. नागाप्रदेश आपल्या हातातून गेल्यासारखाच आहे. आसाम तरी आपल्या हातात राहतो की नाही अशी आजची परिस्थिती आहे. काश्मीरचे काय होणार आहे, हे कोणीच सांगू शकत नाही. मद्रास राज्य हिंदीद्वेषाच्या नावाखाली संस्कृतचाही द्वेष करू लागले असून ' सत्यमेव जयते ' आणि ' आकाशवाणी ' हे विशुद्ध संस्कृत शब्दही आण्णादुराई यांच्या राजवटीला खटकू लागले आहेत. बंगालमध्ये प्रशासन व्यवस्था शिल्लक आहे की नाही असा संभ्रम पडावा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. देशाचा प्रत्येक विभाग स्वतःच्या हिताचा आणि सुखाचा विचार करीत आहे. परंतु संपूर्ण भारताचे हित कशात आहे आणि ते सुरक्षित राखण्यासाठी आपण काय केले पाहिजे या विवंचनेने कोणी व्यथितचित्त झाले आहे असे दृश्य दिसत नाही. आणि म्हणूनच दीनदयाळजी सांगत असत– ' The basic cause of the problems facing Bharat is the neglect of its national identity. '

परंतु एवढे सांगूनच दीनदयाळजींमधला तत्त्वचिंतक थांबत नाही. स्वत्वाकडे पाठ फिरविणारे तत्त्वज्ञान अंगीकारले की मग उरतो को केवळ सत्तास्पर्धेचा खेळ- आणि एकदा का तो खेळ सुरू झाला की माणूस म्हणून माणसाची प्रतिष्ठाच राहू शकत नाही, नराचा नारायण होण्याची शक्यताच उरत नाही असा मूलभूत सिद्धांतही दीनदयाळजी सांगून जातात. या संदर्भात त्यांनी भांडवलशाही आणि साम्यवाद यांचे जे विश्लेषण केलेले आहे ते खरोखरच मननीय आहे. दीनदयाळजी म्हणतात–

' Both these systems, both capitalist and communist, have failed to take into account of the Integral Man, his true and complete personality and his aspirations. One considers him a mere selfish being, lingering after money, having only one law, the law of fierce competition, in essence the law of

jungle; whereas the other has viewed him as a feeble lifeless cog in the whole scheme of things, regulated by rigid rules and incapable of any good unless directed. The centralisation of power, both economic and political is implied in both. Both, therefore result in dehumanisation of man. Man the highest creation of God, is losing his own identity. We must re-establish him in his rightful position, bring him the realisation of his greatness, reawaken his abilities and encourage him to excel for attaining divine heights of his latent personality.'

दीनदयाळजींचा हा प्रदीर्घ उतारा येथे अशासाठी दिला आहे की यावरून त्यांच्या तत्त्वचिंतक मनाच्या उभारीची कल्पना यावी. असा हा विचारशील आणि कृति-प्रधान कर्यकर्ता कालिकत अधिवेशन आटोपून पुण्याला आलेला असताना 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर यांनी त्यांची भेट घेतली. माजगावकरांनी आपल्या 'अन्न-स्वतंत्रता-संचलना'ची माहिती सांगताच दीनदयाळजी उद्‌गारले, "वाह्, वहोत वढिया चीज है। मुझे समय मिला तो मैं भी आपके संचलनमे जरूर भाग लूंगा।"

'स्वातंत्र्याचे स्वदेशीकरण आणि स्वदेशाचे एकीकरण' या महान उद्दिष्टांचे पाथेय घेऊन अन्न-स्वतंत्रता-समितीचे संचलन सुरू झाले आहे. दीनदयाळजीं-सारख्या प्रखर राष्ट्रवादी नेत्याने या संचलनाला आपला आशीर्वाद दिलेला आहे. कोणत्या तरी एका मुक्कामात दीनदयाळजी येणार आहेत असे वेरुळहून निघताना वाटले होते; छे तशी खात्रीच होती, पण आता– !

मोगलसराईला त्या काळरात्री जे काही घडले त्याची मनात संगतीच लागत नाही. श्यामाप्रसाद मुखर्जींचा मृत्यू असाच अनपेक्षित आणि गूढ होता. डॉ. रघुवीरांचा मृत्यू असाच अनपेक्षित आणि अकाली होता. दीनदयाळजींच्या हत्येचे कोडेही असेच गूढ आणि निर्घृण आहे.

भारताला 'स्वत्वा'ची ओळख पटवून देण्यासाठी धडपडणाऱ्या राष्ट्रवादी शक्तींच्या कसोटीचा काळ अद्यापही संपलेला नसावा.

# मॅक्स कॉलि..

। रा त रा णी । रा त रा णी ।

। वि ज य । तें डु ल क र ।




ही माणसे का पिन-कुशन्स !

# एक धमाल करमणूक

पाहिल्याबरोबर तुम्हांला वाटेल हे तर ते आपले रत्नागिरीचे बंडोपंत जोग नाहीतर चिपळूणचे विसूभाऊ दांडेकर वकील ! निदान मला वाटले. पण हे जोग नाहीतर दांडेकर स्कॉटलंडचे होते. यांचे तेथले नाव मॅक्स कॉलि, 'जगातले सर्वश्रेष्ठ मोहनिद्रा आणणार' (वर्ल्डस् ग्रेटेस्ट हिप्नॉटिस्ट) अशी त्यांची किताबत होती. मुंबईतला पाटकर हॉल प्रेक्षकांनी तुडुंब भरला होता आणि उघडलेल्या पडद्याच्या जागी स्टेजवरल्या बारा तेरा रिकाम्या खुर्च्यांच्या हारीसमोर हे चौकोनी अंगलटीचे स्कॉच जोग प्रेक्षकांना अभिवादन करीत उभे होते. प्रेक्षक आपापसात म्हणाले, वाटले होते तेवढा काही रुबाबदार नाही. ग्रेटेस्ट हिप्नॉटिस्ट सर्कसमधल्या रिंगमास्तरसारखा आकड्याच्या मिशांचा आणि तगडाबिगडा असला पाहिजे अशी माझीसुद्धा उगीच कल्पना होती. आमची जरा निराशाच झाली.

जोगसाहेब–चुकलो–मॅक्स कॉलिसाहेब आपल्या शरीरयष्टीपेक्षा जरा अधिक तगड्या आवाजात म्हणाले, " सभ्य स्त्रीपुरुष हो, आजचा माझा



सगळे खोटे पण शंभर टक्के खऱ्यासारखे !

प्रयोग करताना मला वीस वर्षांपूर्वीची आठवण येते आहे. तेव्हा मी प्रथम या देशात आलेलो होतो. तेव्हा मी लष्करात होतो. पण ते जाऊ द्या. मी हिप्नॉटिस्ट आहे. मी जादूचे प्रयोगबियोग करणार नाही आहे. माझ्या बाहीतून आज रात्री ससा निघणार नाही. आपला प्रयोग त्यातला नसतो. मी मानसशास्त्रज्ञ आहे, माणसाला दोन मने असतात. (इथे मी मनातल्या मनात विकट हसून म्हणालो, हात्याच्या ! हे तर आमच्या लहानपणापासून वि स. खांडेकरांनी आम्हांला सांगितले आहे.) एक 'कॉन्शस,' दुसरे 'सबकॉन्शस.' मी कॉन्शसला झोपवतो आणि सबकॉन्शसला माझ्या ऑर्डरी ऐकायला लावतो. त्याला बेटचाला काहीही सांगितले तरी मग ते मानते, त्याबरहुकूम करते. बऱ्यापैकी मजा येतो. कसा तो यानंतर पाहालच. हेच माझे प्रयोग. हे तुमच्या सहकार्यावर अवलंबून आहे. तुमचीच इच्छा असली तर आमचे ओम्फस्स् आज रात्री तुम्ही सहज करू शकाल. पण तुम्ही असे करणार नाही अशी आपली उमेद आहे—'' वगैरे वगैरे. (मनाशी म्हणालो, गारुड्याचा नाहीतर रोडसाइड डॉक्टरचा खेळ ! सुननेको ज्यादा, देखनेलायक कम. चालू द्या जोगसाहेब, आम्ही आहोत...)

## मंद प्रकाशात गाढ झोप

मग मॅक्ससाहेबांनी प्रेक्षागृहातल्या उत्साही मंडळीला प्रयोगात कृपया स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी पाचारण केले. बारा-पंधरा टकली रंगमंचावर हजर झाली. 'काय ! आहोत की नाही आम्ही पण ? ' असा कुणाच्या मुद्रेवर आविर्भाव तर कुणाच्या मुद्रेवर ' बघतो जाऊन काय लबाडी चालली आहे ' असा भाव. साहेबांनी सर्वांना खुर्च्यांवर स्थानापन्न केले. मग रंगमंचावरचा प्रकाश नाइट लॅंपचा असतो तसा मंद निळा झाला. साहेब लयबद्धपणे एखादे स्तोत्र इंग्रजीत म्हणावे तसा या मंडळीला उद्देशून म्हणू लागला, हाताचे पंजे पालथे करून बोटे एकमेकांत गुंतवा; हात लांब समोर धरा. बोटे घट्ट गुंतवा. हात ताठ करा आणि लांबवा. हात लांबवा, बोटे घट्ट करा. आणखी–आणखी. दोन्ही हातांनी पंजावर होईल तेवढा जास्तीत जास्त दाब द्या. आता हात तसेच वर न्या. डोळे झाका. डोळे घट्ट झाका. डोक्याच्या आत आणि आतून वर पाहा. अजून पाहा. आता हात सुटत नाहीत. हात मागे घेता येत नाहीत. डोळे उघडत नाहीत. प्रयत्न करा. करा प्रयत्न. (दोघा तिघांनी डोळे उघडले. मॅक्ससाहेबाने त्यांचे हात चापट्या मारून खाली केले.) तुम्हांला झोप येते आहे. तुम्हांला फारच झोप येते आहे. तुम्हांला मनस्वी झो–प येते आहे. हात शिशासारखे ज–ड झाले आहेत; अंगन् अंग कसे जड आणि जडच झाले आहे. (साहेबाचा स्वरही चांगलाच जड झाला होता.) झोप आवरत नाही, गा–ढ झोप येते आहे. तुम्ही गा–ढ झोपता आहात. तुम्ही म-स्त झोपता आहात. तुम्ही झोपला आहात. पाहा डोळे उघडतात का. (अजून दोघा तिघांचे डोळे किलकिले झाले. मॅक्ससाहेबाने त्यांनाही हलक्या थोबाडीत मारून खेळातून 'आउट' केले.)

मग ही गद्य पण लयबद्ध अंगाई थांबवून, उरलेल्यांना तरी खरी झोप लागली आहे की खोटी ते साहेब तपासू लागला आणि जो तो झोपेचा बहाणाच करीत असलेला सापडला. फटाफटा साहेबाने एकजात सर्वांना ' आउट ' करून टाकले— फक्त एक सोडून. कारण या एका महाभागाला खरेच बसल्या बसल्या, ताणल्या बाहूंनी मोहनिद्रा लागली होती. साहेब जरा खूष झाला. ' आउट ' मंडळीला परत पाठवून पुन्हा त्याने नवे आवाहन केले, ' आता जरा तरुण मंडळी या. तुमचे संपूर्ण सहकार्य मला द्या. धोका नाही. धोका पोचला तर नाव बदलून देईन, पण एकमेक काय करतात ते पाहण्याचा प्रयत्न करू नका. स्वतः मी सांगतो ते मनापासून करा. चला——या लौकर लौकर ' काही तरुण मंडळी रंगमंचावर आली. दोन तरुणीही आल्या. पुन्हा आधीचाच प्रयोग. त्यात आणखी एकजण झोपला. बाकीचे बहाणे. त्यांना परत पाठवले. मग आधीच्या पहिल्या तरुण एक्क्याला साहेबाने त्याच्या मोह-निद्रेतच उठवून उभे केले. शर्ट काढायला लावला. गंजी काढायला लावला. त्याला म्हटले, आता मी तुझ्या या हातात टाचण्या भोसकणार आहे पण तुला ते कळणार नाही आहे. तुला काही कळणार नाही आहे. टाचण्या घेतल्या आणि त्याच्या एका हातात पटापट समूळ भोसकल्या. हूं का चूं नाही ! हातात नाही, लगतच्या देहात नाही, प्रेक्षागृहात नाही. मग पोटाच्या कातडीत दोन टाचण्या टाचल्या. दुसऱ्या झोपले-ल्याच्या दाढीतही एक टाचणी खोचून ठेवली. कुणाला ढीम्म् नाही. जणू मध्यरात्र ! काही डॉक्टर–प्रेक्षक स्टेजवर आले. प्रत्यक्ष खात्री करून गेले. टाचण्या खऱ्या. भोसकणे खरे. रक्ताचा थेंबही नाही. ही माणसे की पिन-कुशन्स ? मग अद्याप उभ्याउभ्याने झोपलेल्या त्या पहिल्याला मॅक्ससाहेबाने जागे केले तर त्याला आधीच्या भोसकाभोसकीचा सुतराम् पत्ता नव्हता. त्याला साहेब म्हणाला, नाही का समजले ? तुझ्याच अंगात मी हा प्रयोग केला. बरे आता जरा त्या दिव्याकडे बघ बरे. आणि आता त्या जाग्याच माणसाच्या हातात पुन्हा दोन टाचण्या पार आतपर्यंत गेल्या ! साहेब म्हणाला, आता जरा इकडे बघ. तो बघून हबकला. माझ्या हातात टाचण्या टोचलेल्या ? पण वेदना-संवेदना तिळमात्र नाही ! साहेबाने टाचण्या लगेच काढून घेतल्या. त्या जाग्या झालेल्याने याविषयी काही चौकशी करण्याच्या आत साहेबाने त्याला कपाळावर टपली मारून पुन्हा झोपवले. साहेब आम्हांला म्हणाला, हिप्नॉटि-झमने शरीराच्या विशिष्ट भागाला निद्रा आणून मोठमोठ्या शस्त्रक्रियाही करता येतात त्याचे इंगित हे आहे. दुसरे मन त्याला काहीही सांगितले की त्याप्रमाणे वागते. खऱ्याखुऱ्या वेदनाही त्याच्यापर्यंत पोचत नाहीत आणि एखादी खोटी वेदना त्याला खऱ्यासारखी भिडवता येते. यथावकाश तेही दाखवू.

मग कॉलिसाहेबाने प्रेक्षागृहातल्या आणखी इच्छुकांवर रंगमंचावरून उभ्या जागी मोहनिद्रेचा प्रयोग केला. एक झोपली. बाकी ' आउट ' झाले. साहेब तिला धरून

चालवत रंगमंचावर घेऊन गेला. पुन्हा साहेबाने आणखी नवे इच्छुक रंगमंचाशी बोलावले. त्यांच्यावर आपला पेटंट ' अंगाई ' प्रयोग केला. या खेपेस सात झोपले. प्रेक्षागृहाच्या जमिनीवर ढकलून पाडले तरी उठले नाहीत ! त्यांनाही साहेब रंगमंचावर घेऊन गेला. सगळ्या खुर्च्या भरल्या. रात्रीच्या पॅसेंजर गाडीच्या डब्यातला सीन हुबेहुब समोर उभा राहिला, बघा ! बसून झोपलेले रांगेने दहा जण ! गाडीचे हलणेच काय ते कमी होते.

## निरनिराळे चमत्कार

साहेब म्हणाला, आज आता एवढे पुरेत. आज जरा तकलीफच झाली. तुम्ही लोकांनी लौकर सहकार्य दिले नाही ! पण ते जाऊ द्या. आणि साहेबाने त्या झोपलेल्या दहांतल्या दरेकाला झोपेतच एकेक क्रमांक देऊन तो त्याच्याकडून वदवून घेतला. मग कुणाकुणाला झोपेत हुकूम देऊन जागेपणी ड्रम वाजवायला लावला, नृत्य करायला लावले, पाय वर करून हातावर चालायला लावले. मध्येच एकदम साहेब ओरडायचा, मेहरू—स्ली–प ! आणि अर्ध्या सेकंदात प्रेक्षागृहातला एक जाड भिगांचा चष्मेवाला हाडकुळा बच्चा खुर्चीतल्याखुर्चीत पटाक्दिशी मोह-निद्रा-वश व्हायचा ! साहेब सांगायचा, या पोराला वश होण्याला मुळीच अवकाश लागत नाही. मेहरू—वेकप ! ! की मेहरू खडखडीत जागा ! जणू कधी झोपलाच नव्हता.

असे काही आश्चर्यजनक प्रयोग करून साहेबाने मध्यंतर जाहीर केले. स्टेजवरच्या झोपेतल्या जाग्या मनांना तो त्याआधी म्हणाला, आता मध्यंतर होत असल्याने मी तुम्हांला उठवून आपापल्या जागांकडे धाडणार आहे. पण लक्षात ठेवा, मध्यंतर संपताच पडदा वर जाईल आणि रंगमंच उजळून उठेल तेव्हा मी इथे रंगमंचावर नसलो तरी तुम्ही सगळे रंगमंचावर येऊन आपापल्या खुर्चीत झोपणार आहा ! कळले ना ? उठा !

आणि काय चमत्कार ! मध्यंतर संपताच ओढल्यासारखे दहांपैकी पाच रंगमंचावर येऊन आज्ञाधारकपणे फलाटावर गाडीची वाट पाहत झोपावे तसे झोपले. एक तर शेंगदाणे चावता चावता झोपला. साहेबाने मोजले, पाचच ! तो दूरध्वनिक्षेपकातून गरजला, बाकीचे कुठे आहेत ? चलो ! आणखी चार आले. स्ली–प ! ! ते झोपले. तरी एक कमी. साहेब म्हणाला, अजून एक कुठे आहे ? कमॉन ! सोने की टैम हुई ! पण तो बेटा येईना. अखेर त्याच्या आसपासचे प्रेक्षागृहातले ओरडले, घर गया, घर ! म्हणजे हा एक घाबरून मध्यंतरात घरी पळाला होता. साहेब नाराजी दाखवीत म्हणाला, असे करता कामा नये. त्याचे आता फार डोके दुखत राहील ! पण जाऊ दे. मी तरी काय करू ?

मग कार्यक्रमाला एकदम भलताच रंग भरू लागला. निद्रावश माणसांच्या ताफ्याकडून नाटक कंपनीला निष्प्रभ करणारे एकेक खेळ कॉलि साहेबाने करवून घेण्याचा सपाटा लावला. जन्मात कधी न गायली, नाचलेली मंडळी गायली आणि

नाचली. इंग्रजी गीत गाणारीला पहिल्या चरणापुढे शब्द आठवत नव्हते तर ती ‘ आता पुढचे शब्द आठवत नाही ’ हेच इंग्रजीत गळयावर तन्मयतने गात राहिली! प्रेक्षक खो–खो– हसत होते पण ते आवाज तिच्यापर्यंत जणू पोचतच नव्हते. निद्रेत साहेबाकडून ‘ सबकॉन्शस ’ मनाला पोचलेल्या हुकुमानुसार निद्रेतच जागे होऊन दूरध्वनिक्षेपकापुढे उमे राहून विनोदी चुटके सांगणाऱ्याला एकही चुटका आठवेना, पण फिकीर नाही ! पु. ल. देशपांड्यांना रिटायर करण्याइतके भयंकर विनोदी चुटके अस्खलितपणे सांगत असल्यासारखा तो गडी नुसतेच हावभाव आणि चेहरे करीत ‘ काय सांगू ’ म्हणून साहेबाला खाजगीत विचारीत राहिला ! आणखी दोघा झोपी गेलेल्यांनी निद्रेत साहेबाच्या सूचना ऐकून अनुक्रमे सोफिया लॉरेन अ॰॰ बेबी नंदा समजून एकमेकांवर निद्रेतल्या जागेपणी बेफाम प्रेम आरंभले. एका निद्रित ललनेने साहेबांच्या सूचनेनुसार जागे होऊन त्यालाच तिचा लाडका नट रिचर्ड बर्टन मानून ‘ रात्री कुठे जाऊ या ’ची प्रेमळ चर्चा भर रंगमंचावर शेकडो प्रेक्षकांपुढे आरंभली ! साहेब तरी असा चावट ! भर ‘ ॲक्शन ’मध्ये प्रत्येकाला शुद्ध आणून संकोचच संकोच आणीत होता आणि लगेच नव्याने झोपवीत होता ! या नऊ झोपी गेलेल्या मंडळींनी त्यांच्या मोहनिद्रेतल्या जागेपणी काय काय म्हणून करायचे बाकी ठेवले ? सर्कसमधल्या महाविनोदी विदूषकांच्या हसून हसून पोट दुखविणाऱ्या लीला पाहून हसा, अशा साहेबाच्या आज्ञेनिशी ही मंडळी डोळयावाटे पाणी वाहीपर्यंत हसून बेजार झाली. (सर्कस कुठे नि विदूषक कसले, समोरच्या अवकाशात पाहणाऱ्या त्या विनाकारण हसत्या माणसांना पाहून प्रेक्षागृहातून आम्हीही हसत होतो. ) अल्प-वस्त्रातले ‘ स्ट्रिप-टीज् ’ नाच यांनी उल्लू के पठ्ठे बनून समोरच्या रिकाम्या अवकाशात पाहिले. भयंकर हृदयद्रावक चित्रपटातले अर्भकाच्या मृत्यूने मातेला झालेले दुःख पाहून हे नऊ जीव, आधी जेवढे हसले तेवढेच ढसढसा, ढसढसा रडले– अगदी ‘ बाळा जोजो ’ नाहीतर ‘ श्यामची आई ’ सिनेमा पाहत असल्यासारखे ! मग कॉलिसाहेबाने त्यांना झोपवून परत उठवले ते पाच वर्षांची पोरे बनवून. या नऊ प्रौढ पोरांनी मग धमाल दंगा केला. एकमेकांच्या पाठीत बुक्के काय घातले, जिभा काय दाखवल्या, उड्या काय मारल्या, घसरून आपटया काय खाल्ल्या, काही विचारू नका. त्यानंतर सगळे झोपून पुन्हा झोपेत उठून बालवर्गात बसले. साहेब–‘ सरां ’नी गणित घातले, दोन अधिक पाच अधिक तीन–बरोबर किती ? रंगीत गोटयांच्या फळयावर हे गणित सोडवताना एकेकाच्या नाकात दम आला. त्यातल्या त्यात हुशार बाप्याने डोके आणि नाक चोळून उत्तर काढले ‘ एकावर शून्य. ’ म्हणजे किती ते दहादा विचारूनही त्याला सांगता येईना ! आता बोला ! मग साहेबाने खेळातले पिस्तुल घेऊन झोपेतल्या जाग्या अवस्थेतच आधी सूचना करून एकेकाला ‘ गोळी ’ घातली आणि खरी गोळी कपाळातून घुसावी तसा एकेक बसल्या जागेवरून मागे तडाड्दिशी उडून लोळला. असा अभिनय

केवळ अशक्य! साहेबाने नसलेली दाढदुखी मग या नऊही विद्यार्थ्यांना देऊन बेजार केले आणि लगेच बरेही केले. त्यांना वारेमाप शिका आणल्या आणि त्या थांबूनही दाखवल्या. त्यांना पाणी दारू म्हणून देऊन अक्षरश: तर्र केले आणि पुन्हा होशमध्ये आणले. इतके कशाला, आपल्या मोहिनी विद्येने एकीला ठार बहिरे, दुसऱ्याला मुके, तिसऱ्याला कमरेखाली लुळे केले, चवथ्याला लकवा आणला, पाचव्याची दातखीळ बसवली–सगळे खोट्टे, पण शंभर टक्के खऱ्यासारखे! चाचण्या घेऊन सगळे खरे ठरले आणि क्षणात सगळे छू मंतर—खलास! पुन्हा सर्वजण पूर्ववत् धडधाकट! साहेब म्हणाला होऊ दे, की सगळे काही फट्दिशी व्हायचे! जणू त्या नऊ माणसांचे स्विचच साहेब मनमानी ऑफ-ऑन वर-खाली करायचा! आणि मध्येच ते ' मेहरू–व्हेअर आर यू ? स्ली–प !' की मेहरू तत्काळ अस्लीप!

भलता मजा आला. हसून हसून पोटे दुखली. ' नऊ झोपाळू आणि एक दादा ' नावाचे प्रभावी का काय म्हणतात तसले नाटकच आमच्या समोर उभे राहिले! प्रत्येक व्यक्तिरेखा गहिरी आणि वेगळी. प्रत्येक ' सिच्युएशन ' धमाल! आपण सांगतो, फिरत्या सरकत्या रंगमंचाशिवाय नाहीतर पद्मा चव्हाणशिवाय साहेबाचे हे ' सायकॉलॉजिकल ' नाटक ज्युबिलया करू शकेल! दर खेळात पात्रे नवीन! संवाद वेगळे! साहेब एकटा फक्त कायम! आणि असल्यास त्याचा लाडका ' मेहरू. '

या गडबडीत या नऊंतल्या एका महिलेची नखे खाण्याची सवय साहेबाने मोडून काढली, (नखे तिला कडू तुरट लागू लागली.) कुणाला धूम्रपान सोडायचे असेल, झोप येत नसेल ती आणायची असेल तर मी ते करून देईन अशा ऑफर्स दिल्या.

ते असो. वेळ मात्र फार छान गेला. साडेतीन तास कसे गेले ते कळले नाही. बाहेर पडताना कुणी पुटपुटत होते, ' काहीतरी लबाडी असली पाहिजे. मागे असलेच सिक्स्थ सेन्सचे प्रयोग करणारा पीटर गोल्डिन म्हणून मुंबईत आला होता तोही लबाडी करीत असे म्हणे. '

आपल्याला काय! आपले तिकिटाचे पैसे पुरेपूर वसूल झाले होते. एरवीतेवी नाटक तरी काय असते? एक प्रकारची पूर्वनियोजित लबाडीच की नाही?

○

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.



# साभार परत...

अनिल बळेल

टप् असा आवाज झाला. पोस्टमननं पुडकं टाकलं होतं. मासिक आहे की काय हे बघण्याच्या उत्सुकतेनं उठलो–पण छे ! कथा छापून येण्यासाठी आमचा घोडा अजून 'वीन' मध्ये यायचा होता. संपादकाने आभारपूर्वक (नस्ती डोकेदुखी म्हणून न वाचताच) माझी कथा परत पाठवली असणार हे त्या पुडक्या-वरून दिसत होतं. कारण हा अनुभव काही नवा नव्हता. मी जितक्या जिद्दीनं निर-निराळ्या मासिकांकडे माझी तीच कथा

पाठवीत होतो तितक्याच जिद्दीनं संपादक महाशय ती परत पाठवत होते (पोस्टेज थोडंच त्यांचं जात होतं ? मीच पुरेसं पोस्टेज कथेबरोबर पाठवीत असे– निर्णयासाठी.) सांगायचं म्हणजे मी ते पुडकं उचललं आणि टेबलावर ठेवून परत पहुडलो.

पण एकदा चाळवलेली झोप परत थोडीच लागते. निद्रादेवीची खूप आराधन केली. ह्या कुशीवरून त्या कुशीवर झालो. पण ती काही आली नाही– झोप हो ! तरुणी आणि झोप ह्यांनी एकदा नाही म्हटले म्हणजे नाही– मग त्यांची कितीही मनधरणी करा. त्यांना प्रसन्न करून घेण्यास फार ताप पडतो. म्हणून अखेर, नुकतंच ग्रंथालयातून आणलेलं पुस्तक वाचावयास घेतलं पण त्यातही मन लागेना. नाही म्हटलं तरी संपादकांना कथा का पसंत पडत नसावी ह्याबद्दल मनात विचार येऊ लागले. तितक्यात दारावर थाप पडली. मी जागेवरून न उठताच विचारलं.

"कोण आहे ?"

"मी, रसिक" आगमनकर्त्यानं बाहेरून ओळख दिली.

"या रसिकराज, दार उघडंच आहे."

रसिकराज आत आला. आल्याबरोबर त्याची काकदृष्टी दाराजवळील टेबलावर पडलेल्या, नुकत्याच आलेल्या पाकिटावर गेली.

"काय रे हे ?" पाकीट घेत रसिक म्हणाला.

"बघ ना. संपादक न वाचताच कथा परत पाठवितात. निदान तू तरी वाचून आपली रसिकता दाखव." मी वैतागून स्वतःहून त्याला कथा वाचण्याची परवानगी दिली. मग काय त्यानं क्षणाचाही विलंब न करता पाकीट फोडून आतले 'फुलस्केप' कागद बाहेर काढले.

"हे रे काय ? कथा स्वीकारावी म्हणून ही युक्ती कवीपासून सुरू केलीस ?"

"युक्ती ? कसली युक्ती ?" रसिकचा प्रश्न माझ्या लक्षात येईना.

"घ चा मा करून आनंदीबाईंनी जसं साधलं तसं तू ण चा णा करून साधण्याचा प्रयत्न करीत होतास की काय ?"

"घ चा मा काय ? ण चा णा काय ?" अजूनही माझ्या काही लक्षात येईना.

"मुलाचं मुलीत अन् मुलीचं मुलात रूपांतर करण्याचे प्रयोग हल्ली चालूच आहेत. तुम्हा लेखक मंडळींना तर तो प्रयोग करणे आगदी सोपे. खरं ना ?" रसिक.

"ए, असं कोड्यात नको बोलूस बुवा."

"हो का ? करून सवरून वरती पुन्हा हा साळसूदपणा का ? चक्क मुलीच्या नावानं कथा पाठवायची अन् म्हणायचं असं कोड्यात नको बोलूस."

"मुलीच्या नावानं ?" मी पलंगावरून एकदम उडीच मारली.

" बघा बघा लेखक महाराज, आपण अरुण कुलकर्णींचे अरुणा कुलकर्णी झाला आहात."

मी त्याच्या हातातून ते हस्तलिखित जवळ जवळ हिसकावूनच घेतलं. आणि माझ्या लक्षात आलं की ते हस्तलिखित माझं नव्हतंच. अरुणा कुलकर्णी नामक कुणा लेखिकेची ती संपादकाच्या 'लाल शाईतील' 'सा. प.' असा शेरा मिळालेली कथा होती. माझ्याकडं ही कथा कशी पाठवण्यात आली. म्हणून मी साशंकतेनं रसिकनं टेबलावर टाकलेलं रिकामं पाकीट बघितलं. त्यावर 'अरुण कुलकर्णी' लिहून माझाच पत्ता अगदी बरोबर लिहिलेला होता. रसिकच्या नजरेस ही गोष्ट आणून देऊन त्यानं माझ्यावर केलेला आरोप किती खोटा आहे, हे त्याला दाखवून दिलं.

" अरे, पण मग ही अरुणाची कथा अरुणकडं कशी ?" रसिकची शंका.

---

**" तू जितकी बनेल आहेस**
**तितकाच मीही बनेल आहे.**
**अगदी शेरास सव्वाशेर "**
**काल्पनिक अरुणाशी मी बोलत होतो.**

---

" ह्या ऽ त्यात डोक्याला ताप देण्यासारखं काय आहे. हल्ली मासिकाकडे दररोज डझनावारी कथा येतात म्हणे. त्यांतील बहुतेक कथा परत पाठविल्या जातात. संपादकीय खात्यातील कारकुनालाच हे काम करावं लागत असावं, आणि त्यानंच हा घोटाळा केला असावा." मी रसिकच्या शंकेचं निरसन करीत म्हटलं.

" तो कसा काय ?" रसिकची 'ट्यूबलाईट' अजून प्रज्वलित होत नव्हती.

" अरे, ही कोण अरुणा आहे, तिची कथाही सा. प. अन् माझी कथाही सा. प. त्याच दिवशी संपादकांनी त्याची वासलात लावली असावी आणि त्या पाकिटात नावातील सारखपणानं कारकुनानं अरुणच्या पाकिटावर लिहिला अरुणाचा पत्ता आणि अरुणाच्या पाकिटावर अरुणचा."

" अच्छा अच्छा. एका कान्यामुळं ही कथा आपणास पाहावयास मिळाली म्हणायची." मुलींना मुलांसारखी नावं ठेवली की असे घोटाळे होतात म्हणत आम्ही ती अज्ञात अरुणाची कथा वाचून काढली. ती एक प्रेमकथा होती. कॉलेजमधील फुलपाखरू वृत्तीवर आधारलेली दोन तरुण मनांची ती एक धुंदफुंद प्रणयकथा

होती. इष्काचा प्याला त्यात काठोकाठ भरून वाहत होता. त्यात मीलनाची आस होती आणि त्या आसेतच कथेचा शेवट झाला होता.

" काय रे 'हे' लिहिणारी मुलगी किती 'गोड' असेल नाही." रसिकनं रसिक प्रश्न केला.

" अलबत ! तिला आता आपण भेटलंच पाहिजे."

" हो ! पण कुठं शोधायची ? "

" तेही खरंच. पत्ता काढता येईल पण ती इथलीच असेल तर ठीक. नाहीतर..."

" छे रे ! ही मुलगी इथलीच असणार, तरुण असणार, इथल्याच कॉलेजमध्ये शिकत असणार अन् शिवाय 'गोड' ही असणार" रसिक पुनश्च 'गोडी'वर आला. गोड म्हणजे सुंदर ही त्याची 'गोड'ची व्याख्या होती.

" हे बघ. आपण असं करू, एक दोन दिवस थांबू. दोन दिवसांत तीच आपल्याकडं येते का पाहू अन् मग पुढील मार्गाला लागू. काय ?"

रसिकला मी सबुरीचा सल्ला दिला पण त्यानंतरचे दोन दिवस मी काही आगळ्याच मन:स्थितीत होतो. संपादकीय खात्यातील कारकुनानं घोटाळा केला होता पण कारकूनही कधी कधी किती छान घोटाळे करतात नाही ? अरुणा कुलकर्णीची नि आपली लवकर गाठ पडावी असं वाटू लागलं होतं. कल्पनेनं मी भेटलोही होतो. मी लेखक, ती लेखिका, दोघेही कथाकार, नवोदित लिखाण करणारे, तरुण लेखनासंबंधी खूप स्वप्न उरी बाळगलेले. त्यामुळे आम्ही दोघं एकत्र आलो आहोत, आमचे विचार परस्परपूरक आहेत. आमच्या दोघांचीही लेखकासंबंधीची, त्यांच्या पुस्तकासंबंधीची आवड, मतं एकसारखीच आहेत. दोघांची 'मंझिल' एकच आहे; त्यामुळे आम्ही हातात हात घालून ती गाठणार आहोत, असे विचार त्या दोन दिवसांत दोनशे वेळा तरी माझ्या मनात येऊन गेले असतील. ही अरुणा दिसायला कशी असेल, बोलायला कशी असेल, वागायला कशी असेल, ह्याचं तिच्या कथेवरून रसिकच्या शब्दांत सांगायचं म्हणजे एक 'गोड' चित्र माझ्या डोळ्यांसमोर साकार झालं होतं. ते चित्र मी माझ्या हृदयात जतन करून ठेवलं होतं.

दोन दिवसांनंतर प्रातर्विधी उरकून आज अरुणा कुलकर्णीचा तपास लावायचा ह्या विचारात मी घराबाहेर पडणार तोच एक मध्यम वयाचे, सडसडीत अंगकाठीचे, उंचेले गृहस्थ दारात येऊन उभे राहिले.

" अरुण कुलकर्णी येथेच राहतात ना ?" त्यांनी मलाच विचारलं.

" हो. मीच तो. या ना आत या" त्यांना बसावयास खुर्ची देत मी उत्तरलो.

" बसून तुमचा जास्त वेळ घेत नाही. एक काम होतं म्हणून आलो होतो." खुर्चीवर बसत ते गृहस्थ म्हणाले.

" आपण ?" गृहस्थाची ओळख पटेना म्हणून मी नाईलाजास्तव विचारलं.

" अरे हो, ते सांगायचं राहिलेचं. माझं नाव कुलकर्णी म्हणजे तुमचा आडनाव-बंधूच म्हणा ना !" गृहस्थ हसत हसत म्हणाले, "ही तुमची कथा चुकून आमच्या पत्त्यावर आली. ती देण्यास आलो होतो."

म्हणजे हे अरुणाचे कोणी काका, मामा, भाऊ दिसताहेत. ही अरुणा बनेलही आहे हं. स्वत: न येता असं दुसऱ्याला पाठविलं काय ? पण आपण तिची कथा परत करायचीच नाही, सापडत नाही, आता शोधून ठेवतो. त्यांनाच पाठवून द्या. असं काहीतरी सांगायचं. तू जितकी बनेल आहेस तितकाच मीही बनेल आहे म्हणावं. अगदी शेरास सव्वाशेर. किलोस सव्वा किलो.

"पण आपणांस माझा पत्ता कसा मिळाला" मी माझं हस्तलिखित घेत विचारलं.

"त्यात काय विशेष ? मासिकाच्या कार्यालयात गेलो. तेथे तुमचा पत्ता मिळाला."

'असं होय' असं मी म्हणणार इतक्यात गृहस्थ विचारते झाले, "माझी कथा आपणाकडे आली आहे का ?"

"माझी कथा ?"

"का एवढे दचकलात ? तुमची कथा जशी माझ्याकडे आली तशीच माझीही कथा तुमच्याकडे आली असण्याची शक्यता आहे म्हणून विचारले."

"एक कथा आली आहे माझ्याकडे. पण ती अरुणा कुलकर्णीची आहे." मी बोलून गेलो.

"अहो तीच ती." कुलकर्णी खदखदून हसत म्हणाले.


"म्हणजे ?"

"अहो माझ्या नावानं प्रथम कथा पाठवीत होतो पण तीवर पसंतीचा शेरा काही पडायचा नाही म्हणून ही युक्ती शोधून काढली."

" आँ ! मग ही अरुणा कोण ?"

"कोणी नाही. ही व्यक्तीच अस्तित्वात नाही. ते एक माझं आवडतं नाव आहे."

मी कुलकर्ण्यांची सा. प. कथा तत्काळ परत केली आणि कपाळावर हात मारून पलंगावर आदळलो.





सातवाहन राजकुलाच्या अस्तानंतर दक्षिणापथातील सत्तेचा गुरुत्वबिंदू विदर्भात नंदीवर्धन व वत्सगुल्म या राजनगरींकडे सरकला. राजतडाग – पैठण ही नगरे वाकाटक राजकुलाच्या आधीन झाली.

समुद्रगुप्त, चंद्रगुप्त विक्रमादित्य आदी गुप्त सम्राटांनी उत्तर व दक्षिण भारतात दिग्विजयाची संचलने काढली तेव्हा वाकाटक कुलातील प्रवरसेन, हरिषेन, पृथ्वीसेन, रुद्रसेन, आदी नृपतींनी संपूर्ण महाराष्ट्र आपल्या आधिपत्याखाली आणला होता. वाकाटकांना विंध्याद्रीच्या पलीकडे गुप्तांच्या साम्राज्यबलाचा सामना करायचा असल्यामुळे वाकाटक-युगातील राजकारणाचा गुरुत्व-बिंदू विदर्भात राहणे अनिवार्य होते.

वाकाटकांच्या प्रभावामुळे महाराष्ट्राला ग्रासू पाहणारे गुप्तवर्चस्वाचे ग्रहण सुटले. समुद्रगुप्ताच्या विजयी सैन्याने महाराष्ट्राच्या चतुःसीमा टाळून दक्षिणदिग्विजय केला ही गोष्ट इतिहासाच्या नजरेतून कशी सुटेल ? सुविख्यात गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्य ह्याने तर आपली सुलक्षणी कन्या प्रभावती गुप्त हिचा विवाह वाकाटक-नृपती रुद्रसेन द्वितीय याच्याशी घडवून आणून महाराष्ट्राशी सख्य जोडले. वाकाटक व गुप्त, महाराष्ट्र व मगध यांच्या जोडल्या गेलेल्या सख्यामुळेच मालवा आणि सौराष्ट्र या भागातील शक-क्षत्रपांची सत्ता संपुष्टात आली.

वाकाटक राजघराण्याची मुख्य शाखा प्रथम नंदीवर्धन आणि मागून प्रवरपूर येथे होती तर दुसरी शाखा

# मराठीचे माहेर जेव्हा हिऱ्यासम लखलखले!

वत्सगुल्म (वाशिम) येथे होती. वत्सगुल्म शाखेतील हरिषेन नृपतीच्या कारकीर्दीत अजिठ्यातील काही विश्वविख्यात शैलगृहे कोरली व रंगविली गेली. देव-गिरीहून ६० मैल अंतरावर असलेली अजिठ्याची लेणी व ८ मैल अंतरावर असलेली वेरुळची लेणी म्हणजे जागतिक कलाविश्वातील देदिप्यमान दालने आहेत. यांपैकी वेरुळची शिल्पसृष्टी चालुक्य–राष्ट्रकूट काळात उभारली गेली तर अजिठ्याची महत्त्वाची शैलगृहे वाकाटक-काळात.

### ह्यू एन त्संगने बघितलेला महाराष्ट्र

वाकाटक राजघराण्याची पडझड झाल्यानंतर दक्षिण भारतात चालुक्यांनी उठाव केला. महाराष्ट्र–कर्नाटकाच्या सीमेवरील वातापी ऊर्फ बदामी ही चालुक्यांची प्रारंभीची राजधानी.

गोमंतकातील कदंब, कोकणातील मौर्य, कांचीचे पल्लव आणि कलिंगातील चेदी आदी दक्षिणेतील सत्तांना पराभूत केल्यानंतर चालुक्य-नृपती द्वितीय पुल-केशीन ह्याने नर्मदा पार करून उत्तरापथाचा अधिपती श्रीहर्षवर्धन याचा पराभव करून नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेल्या त्रिमहाराष्ट्रकांचे सार्वभौमत्व संपादन केले. चालुक्यांच्या काळात दक्षिण भारतातील राजकीय गुरुत्वबिंदू पुन्हा देवगिरीच्या परिसरात परतला असे दिसते. द्वितीय पुलकेशीनच्या कारकीर्दीत सुप्रसिद्ध चिनी यात्रेकरू ह्यू एन त्संग हा महाराष्ट्रात आला होता. ह्यू एन त्संगच्या वर्णनावरून चालुक्यांची प्रमुख

प्रा. पंढरीनाथ रानडे

राजधानी देवगिरी येथे असावी असे दिसते. काही इतिहासकारांच्या मते ही राजधानी नाशिकला असावी. देवगिरी—नाशिक ह्या परिसरात बघितलेल्या महाराष्ट्रीय लोकांसंबंधी ह्यू एन त्संगने पुढील उद्गार आपल्या प्रवासवृत्तांतात काढले असल्याचे सुप्रसिद्ध आहे.

"महाराष्ट्राची भूमी सुपीक आहे. तिच्यात विपुल धान्य पिकते. तेथील हवा उष्ण आहे. येथील लोकांची राहणी साधी आहे. येथील लोक कमालीचे प्रामाणिक, बाणेदार व स्वाभिमानी आहेत. त्यांचा कोणी अपमान केल्यास ते तो विसरू शकत नाहीत. त्याबद्दल आपल्या प्राणाची बाजी लावून उसने फेडल्याशिवाय राहत नाहीत. युद्धात शरण आलेल्यांना मात्र ते अभय देतात. रणांगणातून आपला सेनापती पाठ दाखवून परत आल्यास त्याला लुगडे नेसवण्यास हे लोक कमी करीत नाहीत.

महाराष्ट्रातील लोक आपल्या शत्रूस आधी सावध करून मग त्याजवर सूड घेतात. बेसावध शत्रूवर ते तुटून पडत नाहीत."

महाराष्ट्राचा राजा पुलकेशीन हा श्रीहर्षवर्धनाचा प्रतिस्पर्धी. ह्यू एन त्संग हा हर्षवर्धनाचा अतिथी होता. धार्मिक बाबतीतही त्याची सहानुभूती हर्षवर्धनाकडे होती. एवढे असूनही ह्यू एन त्संगने महाराष्ट्राचा अधिपती पुलकेशीन द्वितीय याचे काढलेले शब्दचित्र निःपक्षपाती आहे. ह्यू एन त्संग लिहितो, "महाराष्ट्राचा राजा उदारमतवादी असून दूरदर्शी आहे. त्याच्या औदार्याचे व दातृत्वाचे क्षेत्र फार मोठे आहे. त्याच्या प्रजेचे त्याच्यावर प्रेम आहे. खऱ्या योद्धयाला शोभेल अशीच त्याची अभिरुची व रसिकता असून तो युद्धातील यशाला सर्वांत अधिक महत्त्व देतो. याच कारणास्तव त्याच्या राज्यातील पायदळ व घोडदळ अति दक्ष व सदा सुसज्जित असते. लष्करी शिस्तीची येथे कडक अंमलबजावणी केली जाते. लढाईच्या प्रारंभी हे सैनिक उन्मत्त होईपर्यंत मद्यप्राशन करतात व मग त्यांच्यापैकी हातात भाला घेतलेला एकेक शिपाई शत्रूच्या दहा हजार सेनेला भारी असतो. या स्थितीत त्याच्या मार्गात येणाऱ्या एखाद्या माणसाची त्याने कत्तल केली तरी कायदा त्याला शासन करीत नाही. जेव्हा युद्धासाठी सेना चालू लागते तेव्हा हे शूर मराठी शिपाई दुंदुभीच्या तालावर सैन्याच्या आघाडीला चालतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचा हा सम्राट आपल्या हत्तीखान्यात हजारो मोठे हत्ती युद्धासाठी तयार ठेवतो. लढाईचा क्षण जवळ आला की या हत्तींना दारू पाजण्यात येते. आणि मग मद्याने मत्त झालेले हे मातंग शत्रुसेनेवर प्रपाताप्रमाणे कोसळतात. या स्थितीत जे जे म्हणून त्यांच्यापुढे येईल त्याचा ते चक्काचूर करून टाकतात."

महाराष्ट्राच्या सैनिकी सामर्थ्यापुढे श्रीहर्षवर्धनाचे काही एक चालले नाही. हर्ष—पुलकेशीन संघर्षाबद्दल ह्यू एन त्संग म्हणतो, "सांप्रत सम्राट श्रीहर्षवर्धन पूर्व टोकापासून पश्चिम टोकापर्यंत विजयी आहे. श्रीहर्षाने दूरदूरच्या लोकांना वश केले आहे

व शेजारच्या प्रदेशातील राजे त्याच्या भयाने कापतात. परंतु एक महाराष्ट्राचे लोक मात्र त्याला शरण गेले नाहीत. हर्षाने बाकीच्या सर्व भारतातील सेनेचे सेनापतित्व स्वीकारून अनेक वेळा महाराष्ट्रातील लोकांवर स्वारी केली आहे, पण येथील लोकांचा प्रतिकारभंग तो कधीच करू शकला नाही."

## त्रिदलीय संघर्ष

महाराष्ट्रातील चालुक्यांची सत्ता पुढे राष्ट्रकूट राजकुलाने हाती घेतली. महाराष्ट्रात देवगिरीच्या परिसरात राष्ट्रकूटांचा उठाव होत असताना गुजराथमधील चालुक्यकुलीन राजपुत्र अवनीजनाश्रय पुलकेशी ह्याने आठव्या शतकाच्या पूर्वार्धात गुजराथ-सिंधच्या सीमेवर अरबांचे आक्रमण पिटाळून लावल्याचा रोमहर्षक वृत्तांत सन ७३९ मधील नवसारी येथील ताम्रपट कथन करतो. चालुक्य अवनीजनाश्रय पुलकेशी ह्याने उत्तर भारतातून अरब आक्रमकांना कायमचे पिटाळल्यामुळे पुढील अडीच शतके मुस्लिम आक्रमणापासून भारत मुक्त राहिला.

ख्रिस्तोत्तर आठवे व नववे ही दोन शतके म्हणजे राष्ट्रकूट, प्रतिहार व पाल ह्या तीन राजघराण्यांच्या भारतीय सार्वभौमासाठी चाललेल्या त्रिदलीय संघर्षाची शतके आहेत. बंगालचे पाल, कान्यकुब्जचे प्रतिहार आणि महाराष्ट्रातील राष्ट्रकूट या त्रिदलीय संघर्षात अखेर राष्ट्रकूटांची सरशी होऊन भारतीय सार्वभौमत्वाची जयमाला दक्षिणापथाच्या गळ्यात पडली. राष्ट्रकूटांच्या यशाचा डिमडिम सतत दोन शतके भारताच्या आसमंतात घुमत होता.

राष्ट्रकूट राजघराण्याची राजधानी प्रारंभी एलापुर अथवा वेरूळ येथे होती असा निर्वाळा महामहोपाध्याय डॉ. मिराशी ह्यांनी दिला आहे. कांची, महाबलीपुरम, बदामी, मदुरा आदी दक्षिणेतील सत्ताकेंद्रांचे हरण केल्यानंतर राष्ट्रकूटांनी उज्जैनी, प्रयाग, कान्यकुब्ज येथील सत्ताधिकाऱ्यांशी सामना करून भारताचे सार्वभौमत्व देवगिरी—एलापुरच्या परिसरात खेचून आणले.

गोदाकाठच्या अश्वदलाच्या विजयी पताका सातवाहन आणि चालुक्य काळात दशार्ण व अवंती महाजनपदात फडकल्या होत्या. परंतु यक्ष, गंधर्व आणि देवतांचे निवासस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगाधिराज हिमालयाच्या शैलशिखरांना गोदेच्या लेकरांचा पराक्रम जवळून बघण्याचा योग राष्ट्रकूट काळातच आला. कृष्णा आणि गोदा ह्यांच्या उदकाने जेव्हा राष्ट्रकूट नृपतींनी नगाधिराज हिमालयाला अर्घ्यप्रदान केले तेव्हा भारतीय इतिहासाचे क्षितिज एका नव्या तेजाने झळाळले. या रोमहर्षक प्रसंगाची स्मृती चिरंतन राहावी म्हणूनच वेरुळच्या डोंगरात कैलासचे शिवालय कोरून घडविले गेले.

राष्ट्रकूट राजघराण्याच्या अखेरच्या दिवसांत सेऊण देशात यादव व कल्याणीला उत्तर चालुक्य यांनी उचल खाल्ली. यादव कुळाचे मूळ ठाणे सिन्नर येथे होते. पुढे भिल्लम यादवाने देवगिरीला नवे नगर वसवून तिथे यादवांच्या राजधानीचे ठाणे ठेवले.

यादव कुलातील राजपुरुषांच्या पराक्रमाची गाथा हेमाद्रीने व्रतखंडात गायली आहे. यादवांनी आपणास लावलेले बिरुद ' प्रौढ प्रताप चक्रवर्ती ' हे त्यांच्या राजकीय दर्जाचे गमक आहे. यादवांचा महामंत्री हेमाद्री याचा उल्लेख तत्कालीन लेखांतून निखिलराज्यधुरीणतम, समस्तकरणाधिपती, झाडीमंडलजेता, मंत्रिचूडामणी या विरुदासमवेत आला आहे.

याच यादवकुलातील रामचंद्र नृपतीच्या राजवटीत ज्ञानेश्वरांनी आपली अमृतवाणी महाराष्ट्राला ऐकविली.

**तेथ यदुवंश विलासु । जो सकळ कळानिवासु**
**न्यायाते पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र**

या ओवीत ज्ञानदेवांनी समकालीन महाराष्ट्राच्या राजकीय जीवनासंबंधी तृप्ती आणि समाधान व्यक्त केले आहे. परंतु ज्ञानदेवांची ही तृप्तीची आणि समाधानाची भावना अनाठायी होती, असे थोड्याच वर्षांत पुढील इतिहासाने ठरविले.

यादवांच्या काळात देवगिरीचे परिसर समृद्धीने पोसले होते हे तत्कालीन वाङ्मयावरून आपणांस समजते. यादवांच्या पतनानंतर थोड्याच दिवसांनी तुघलकांच्या कारकीर्दीत विख्यात अरब प्रवासी इब्न बतूता देवगिरीला आला होता. देवगिरी नगरीतील व्यापारी पेठा, नर्तकी आणि गायिकांचे प्रासाद यांचे बहारदार वर्णन इब्न बतूताने केले आहे. देवगिरीच्या परिसरातील मराठी रमणींच्या सौंदर्याचीही इब्न बतूताने तारिफ केली आहे. देवगिरीच्या किल्ल्याचेही इब्न बतूताने वेचक शब्दांत पण उठावदार वर्णन केले आहे.

## दुर्ग राज – देवगिरी

देवगिरी ऊर्फ दौलताबाद येथील किल्ला जगातील एक अद्वितीय किल्ला असल्याचे इब्न बतूतासारख्या मध्ययुगीन अरब प्रवाशापासून ते थेट सिडने टॉयसारख्या आधुनिक स्थापत्यकोविदापर्यंत सर्वांनी मुक्त कंठाने नमूद केले आहे.

सुमारे पाऊण मैल परिघाचा व ६०० फूट उंचीचा एक सलग डोंगर चारी बाजूंनी वर्तुळाकार तासून काढून यादवकालीन कारागिरांनी देवगिरीचा अभेद्य दुर्ग घडविला. दुर्गाची तासून काढलेली कड म्हणजेच दुर्गाची पहिली अभेद्य भिंत. ही तासून काढलेली कड १५० फूट असून कडेच्या भोवती खडकातच कोरलेला खंदक आहे. या खंदकातून मुख्य दुर्गात प्रवेश घेण्यासाठी एकमेव रस्ता म्हणजे एक झुलता पूल. या दुर्गाच्या सभोवती तीन मैल परिघ असलेला दगडी बांधणीचा एक मजबूत तट असून त्या तटाभोवती पुन्हा एक खंदक आहे. या तटाच्या भिंतीत जागोजाग बुरुजांची योजना असल्यामुळे तटबंदीला भक्कमपणा आला आहे.

शलदुर्ग व भूदुर्ग यांचा समन्वय देवगिरी दुर्गात साधला गेला आहे. दुर्गाला आरंभ बाहेरच्या भिंतीपासून–भूमीपासून झाला आहे या अर्थाने तो भू-दुर्ग आहे तर खड-कात तासून काढलेला आहे या अर्थाने तो शैल-दुर्ग आहे. पश्चिम महाराष्ट्रात अनेक डोंगरी दुर्ग आहेत. पण डोंगर चढून माथ्यावर पोहचेपर्यंत आपणांस किल्ल्याचा मागमूस लागत नाही. देवगिरीचे तसे नाही. येथील किल्ल्याला पायथ्यापासूनच सुरुवात होते.

देवगिरीच्या किल्ल्यात मध्ययुगीन महाराष्ट्रातील सर्व राजघराण्यांच्या खाणाखुणा विखुरल्या आहेत. जनार्दन स्वामींची समाधि, यादवकालीन भग्न मंदिर, अल्लाउद्दीनचा मनोरा, कुतुबुद्दिन मुबारकची मशीद, ' महंमद औरंगजेब बादशाह गाझी 'ने घडवलेली प्रचंड मेंढा तोफ ही सर्व स्मारके देवगिरीच्या मध्ययुगीन इतिहासाला बोलके करतात.

देवगिरीचा दुर्ग बांधताना यादवकालीन स्थापत्यकोविदांनी जागोजाग कल्पकता दाखवली आहे. झुलता पूल पार करून दुर्गात प्रवेश केल्यानंतरही सरळ मार्गाने किल्ल्यावर जाता येत नाही. पुढचा प्रवास डोंगर पोखरून तयार करण्यात आलेल्या एका अंधारी – भूमिगत मार्गातून करावा लागतो.

देवगिरीच्या माथ्यावर पोहचल्यावर बघणाऱ्यांची दृष्टी दूर दूर अंतरावर जाते. नाथांचे पैठण, ज्ञानेश्वरांचे आपेगाव, रामदासांचे जांब, खोलेश्वराची जोगाईची आंबा, गोरा कुंभाराचे तेर, या दिशांनी आपली नजर जाते. आणि देवगिरीच्या पंचक्रोशीत असलेल्या घृष्णेश्वर मंदिर, वेरूळची लेणी, खुलताबाद येथील औरंगजेब आणि मलिकअंबर यांची अखेरची विश्रांतिस्थळे, चांग बोधल्याची समाधी, बाबाजी, विठाजी आणि मालोजी भोसले यांची समाधिस्थाने, आझमशाहाने आपल्या आईसाठी बांधलेला बिबीचा मुकबरा, बाबा मुसाफरशाहाची पानचक्की इत्यादी स्मारकांना आपली नजर धुंडाळू लागते. काही स्मारके तात्काळ दिसतात तर काहींच्या केवळ चतु:सीमाच दिसतात.


असा हा दुर्गराज देवगिरी म्हणजे यादवकालीन कारागीरांनी भारतीय दुर्ग-स्थापत्याला दिलेली अद्वितीय देणगी आहे.

## संतांनी उभारली क्रांतीची गुढी !

समृद्धीने गजबजलेल्या यादव काळातच महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक अभूतपूर्व क्रांती घडून आली; आणि ती म्हणजे महाराष्ट्रातील बहुजनसमाजाची बोलभाषा मराठी हिचा उठाव. अकराव्या शतकाच्या पुढे संपूर्ण हिंदुस्थानातच बहुजनसमाजाच्या भाषांनी प्रांतोप्रांती उठाव केला असल्याचे आपणांस दिसते.

अभिजात वर्ग आणि त्या वर्गाची संस्कृत भाषा या दोघांच्याही बडेजावाविरुद्ध महाराष्ट्रात ज्ञानेश्वरांनी क्रांतीची गुढी उभारली. हीच गुढी घेऊन पुढे नामदेव, एकनाथ, शेख महंमद, गोरा कुंभार, चोखा आणि तुकाराम पंढरीच्या वाळवंटात

विठ्ठलनामाचा गजर करते झाले. याच काळात महानुभाव मंडळींनी कर्मकांडावर आधारलेल्या समाजजीवनावर निर्मम कोरडे ओढलेत.



याच काळातील मराठी समाजाची समृद्धी ही केवळ दिखाऊ आहे; समाजवृक्षाला कीड लागली आहे; लोकसत्तावादी इस्लामच्या आघातापुढे हा समाज टिकू शकणार नाही याची जाणीव महानुभावांना तीव्रतेने झाली होती असे दिसते. स्मृतिस्थळ या महानुभाव ग्रंथात एके ठिकाणी नागदेव ऊर्फ भटोबा आणि त्याचा शिष्य यांच्यांत झालेला संवाद या दृष्टीने अर्थपूर्ण आहे. अल्लाउद्दीन खिलजीच्या सैन्याने देवगिरीचा राजा रामदेवराव पकडला गेल्याचे वृत्त नागदेवाने आपल्या शिष्याला पुढील शब्दांत सांगितले : " रामदेवो रावो तोहि धरिला आणि धरीला तो संतमहंतचिया वोखरिया प्रवर्तला म्हणौनी : परी हे हातवणी : जेवण पुढा उरलेची असे : "

इ. स. १३१२ मध्ये यादवकुलाची इतिश्री होऊन देवगिरीला दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याचा अंमल सुरू झाला. खिलजींच्या मागून तुघलक आले. महंमद तुघलकाच्या काळात देवगिरी दौलताबाद होऊन दौलताबादला औटघटकेची का होईना हिंदुस्थानची राजधानी होण्याचे भाग्य लाभले.

तुघलकांचे वर्चस्व झुगारून देऊन हसन गंगूने दख्खनेत बहामनी राज्याची ग्वाही फिरविली. पुढे बहामनी राज्यातूनच गोवळकोंड्याची कुतुबशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, एलिचपूरची इमादशाही आणि बीदरची बारिदशाही अशा पाच पातशाह्या दख्खन देशात पुढे आल्या.

महाराष्ट्रातील जुने राजवंश उन्मळून पडले. देवालयाचे गाभारे भंगले, अजिंठा, वेरूळ आणि पैठण येथील विद्यापीठे उद्ध्वस्त झाली. पण सर्वस्व आटोपले नाही. ब्रह्मवृंदांनी मुसलमान राज्यकर्त्यांशी हातमिळवणी करून आपली अग्रहार वतने शाबूत ठेवली. नाडलेल्या-गांजलेल्या काही अस्पृश्यांनी इस्लामचा स्वीकार करून ज्या स्थानापासून त्यांना पिढ्यानुपिढ्या वंचित ठेवण्यात आले होते ती प्रतिष्ठेची स्थाने पटकावली.

मराठी जीवन आता एका कोंडीत सापडले होते. सत्ताधिकारी परकीय व परधर्मीय, समाजाचे बौद्धिक नेतृत्व करणारा वर्ग नेभळट आणि बांडगुळी वृत्तीचा. गावच्या पाटील आणि देशमुख मंडळींनीही इस्लामी राजवटीशी नमते-जमते घेतलेले. अशा काळात एक नवे नेतृत्व महाराष्ट्रात उभे झाले. संत पुढे आले. मुसलमान सत्ताधिकाऱ्यांशी हुज्जत घालण्याच्या भानगडीत ही मंडळी पडली नाही. आम्हांला कोणतीही मिरास नको, सरंजाम नको; आम्हांला राज्य हवे ते वैकुंठाचे, तिथे हिंदु-


तुर्क हा विसंवाद नाही, या बैठकीवर या नव्या नेतृत्वाने महाराष्ट्र उभा केला. महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. आपेगावच्या ज्ञानेशाने ही ज्योत प्रथम उजाळली. पंढरपूरचा नामा, पैठणचे एकनाथ, कृष्णदयार्णव, आंब्याचे दासोपंत, दौलताबादचा चांग बोवला, श्रीगोंद्याचा शेख महंमद, नगरचा गोरा कुंभार, देहूचा तुकाराम आणि फलाण्याचे फलाणे असे कितीतरी, या सर्व ज्योती एकमेकात विलीन होऊन मानवतावादी श्रद्धेचा सूर्य महाराष्ट्रात उगवला. या श्रद्धासूर्याच्या प्रकाशातच आधुनिक महाराष्ट्राचे सारस्वत रचले गेले. महाराष्ट्रातील मुसलमानी राजवट अशा रीतीने इतिहासाने एक वरदानच ठरविले.

पाच पातशाहांच्या पदरी वाढलेले मराठी सरंजामदार म्होरके आणि त्यांचे मुसलमान सहकारी संतांच्या चळवळींपासून चार हात दूर असले तरी त्यांच्या राजकारणाला संतांची चळवळ उपकारकच ठरली. बुरहान निजामशाह, इब्राहिम आदिलशाह, मलिकअंबर, मालोजी आणि शहाजी भोसले या शिवपूर्वकालीन महाराष्ट्रातील राजपुरुषांनी संत आणि अवलिये यांना दिवाबत्तीसाठी दिलेली अनेक वतने कागदोपत्री नमूद आहेत.

उत्तरेतील मोंगलांच्या आक्रमणाविरुद्ध आख्खा दख्खन एकजूट करावा हे एकमेव सूत्र मलीकअंबर आणि शहाजी भोसले ह्यांच्या मुत्सद्देगिरीत गोवले गेले होते. दख्खनची एकजूट मुत्सद्द्यांनी साधण्यापूर्वी मराठी संतांनी साधली होती. टाळ-मृदंग बडविणाऱ्या संतांचा आणि मराठा सत्तेच्या उदयाचा संबंध हा असा आहे.

देवगिरीच्या दुर्गाने हा सर्व घटनापट बघितला आहे. देवगिरीच्या वास्तूत आणि पंचक्रोशीत आजही सातवाहनांपासून शहाजीपर्यंत घडलेल्या मराठी इतिहासाच्या खाणाखुणा विखुरलेल्या दिसतील. एकदा बघायला याच ! ○



# पुस्तके

अखिल भारतीय हिंदी संस्था संघाच्या महामंत्रिपदावर सर्वांच्या संमतीने ज्यांची निवड झाली त्या ' नेनेजीं ' च्या काही स्मृती श्री. रंजन परमार यांनी या छोटयाशा पुस्तकात ग्रथित केलेल्या आहेत. भाषाविषयक आणि हिंदी-इंग्रजी-संघर्षाच्या सध्याच्या ज्वलंत पार्श्वभूमीवर काहीतरी विचारप्रवर्तक, उद्बोधक आणि मौलिक विवेचन वाचावयास मिळेल, या अपेक्षेने आणि औत्सुक्याने हे पुस्तक वाचावयास घेतले; आणि संपूर्ण निराशा झाली. बुद्धीस खाद्य मिळेल, निदान समाधान मिळेल असे काहीही या पुस्तकात नाही. ' गोष्टीरूप गांधीजी ', ' लोकमान्यांच्या गोष्टी ', 'गोष्टीरूप चरित्रे', अशासारख्या सुबोध (मिळमिळीत) शालेय चोपड्यांच्या पंक्तीत बसणारेच हे पुस्तक निघाले. गांधीजी आणि लोकमान्य यांची चरित्रे निदान असामान्य कोटीतील तरी आहेत. त्यांतील सावेसुधे कणसुद्धा सुवर्णकण वाटतात. चातकांची तहान भागविणाऱ्या जलबिंदूप्रमाणे वाटतात. पण या नेनेजींच्या चरित्रातील काही मोठ्या चमकदार घटनासुद्धा पराकाष्ठेच्या सपकपणाने, रुक्षपणाने, हकीकतवजा सांगितल्याने त्यांतील सर्व चमक निघून गेलेली आहे. नेनेजी स्वत: सांगत आहेत असे प्रथमपुरुषी निवेदन करूनही त्यांत आत्मीयता आलेली नाही.

माहितीच्या दृष्टीने ' राजभाषा आयोग ' आणि त्यानंतरची ३–४ प्रकरणे चांगली आहेत. भारताची राजभाषा हिंदी करण्याच्या बाबतीत भिन्नभिन्न मत-

**निशिकांत मिरजकर**

प्रवाह कोणकोणते आहेत त्याचा चांगला आढावा या ठिकाणी घेतलेला आहे. नेनेजींच्या अभ्यासपूर्ण विद्वत्तेबद्दल वादच नाही. परंतु त्यांचे अभ्यासपूर्ण निष्कर्ष येथे अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडलेले नाहीत. जाता जाता गोष्टी सांगाव्यात तसे सांगितलेले आहेत. "कहीं कोई त्रुटि हो तो उसका दायित्व मुझपर ही है।" असे लेखकाने प्रस्तावनेत म्हटलेले आहेच. नेनेजींचे मूलगामी विचार वजनदारपणे मांडले गेले नाहीत ही लेखकाची कमतरता आहे.

तथापि सहजपणे सांगितलेल्या या संस्मरणातून काही मौल्यवान विचारकण आढळतात ते पुढीलप्रमाणे :

(१) १९३८ मध्येच हिंदीप्रचाराइतकेच हिंदीविरोधाचे कार्यही जोरदारपणे चालू होते. [ "जुलूस मामूली नहीं था। हज़ारों की तादाद में लोग शामिल थे। यह भी हमारे लिए आश्चर्य की बात थी।..." पृ० ५ ]

(२) हिंदीप्रचार आणि हिंदीविरोध या बाबतीत अनेक प्रतिष्ठित पुढाऱ्यांनी सहज 'पक्षांतर' केले. [ "उस समय राजाजी को देखा था, जो हिंदी के जबरदस्त समर्थक थे और इसी कारण उनका आन्दोलनकारियों द्वारा निषेध हो रहा था। आज वे ही राजाजी स्वयं हिन्दी के खिलाफ आवाज़ उठा रहे हैं और हिन्दी-विरोध को लेकर संगठन भी कर रहे हैं। समय का कैसा करुण विडम्बन है !... पृ० ५ ]

(३) भारताची राजभाषा हिंदी आणि पाकिस्तानची उर्दू अशी भावना फाळणीमुळे निर्माण झाली. त्याआधी हिंदी, हिंदुस्थानी आणि उर्दू या तिन्हींच्या प्रचारावर सारखाच जोर दिला जाई. [ "जो कांग्रेसजन हिंदुस्तानी का समर्थन करते थे वे कहने लगे कि अब हमारी राष्ट्रभाषा हिंदी होगी और पाकिस्तान की उर्दू। यह विभाजन संबंधी प्रतिक्रियात्मक उद्रेक का प्रभाव था।" ] कै. महात्मा गांधींच्या मते तर हिंदीच्या शिक्षणासाठी देवनागरी आणि उर्दू अशा दोन्ही लिपी प्रत्येकाला पहिल्यापासून शिकविणे आवश्यक होते.

(४) हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून निश्चित केल्यावर पुढील गटांची पुढीलप्रमाणे प्रतिक्रिया झाली :

१. काश्मीर, पंजाब, हिमाचल प्रदेश वगैरे :– येथे उर्दूचा प्रचार जास्त. हिंदी त्यांना जवळची. पण हिंदी सरळ असावी, विद्वज्जड नसावी हा त्यांचा आग्रह.

२. महाराष्ट्र, गुजराथ वगैरे :– यांना हिंदीविषयी उत्साह आणि तिच्या विकासाची आवड. प्रांतीय कामकाज आपल्या भाषेत करण्याची यांना समर्थता, पण हिंद सरकारने लौकरच सर्व कामकाज हिंदीतून करावे असा आग्रह.

३. बंगाल, आसाम, उडीसा वगैरे :– बंगालखेरीज बाकीच्यांचा हिंदीच्या बाबतीत उत्साह. फक्त बंगालचा अनुत्साह. कारण बंगालीच्या तुलनेने हिंदी निकृष्ट. न्यूनगंड आणि अहंगंड यांचा संघर्ष.


४. म्हैसूर, केरळ, आंध्र, मद्रास वगैरे :–इथे म्हणे हिंदीविषयी अनुकूलता आणि उत्साह (नेनेजींच्या मते!) आहे. पण या लोकांचा व्यवहारवाद जास्त तीक्ष्ण आहे. इतक्यातच हिंदीला राजभाषा बनविण्यास त्यांचा विरोध आहे. त्यांची विचारधारा अशी : हिंदीमध्ये अजून राजभाषा बनण्याची पात्रता नाही. तिच्या विकासास अजून अवधी पाहिजे. तोवर आपल्याला थांबले पाहिजे. तोवर इंग्रजीचाच उपयोग केला पाहिजे. इंग्रजीच्या बाबतीत देशातील सर्व लोकांना समान संधी मिळाली आणि सर्वांनी सारख्या पातळीवर इंग्रजीचे ज्ञान प्राप्त करून घेतले. हिंदीच्या बाबतीत अजून ही स्थिती नाही. देशातील काही लोकांची भाषा हिंदी आहे. इतरांची नाही. सरकारी नोकरीच्या बाबतीत अशा लोकांच्या संबंधी पक्षपात होणे अपरिहार्य आहे. "यह बात इन्कार नहीं की जा सकती कि उनकी दलील और दृष्टिकोणमें तथ्य है।" असे नेनेजीसुद्धा म्हणतात. मात्र "उनका हिंदीविरोध, हिंदीका विरोध नहीं–किन्तु हिंदी को सन १९६५ से राजभाषा बनाने का विरोध है। वे हिंदी पढने के लिए समय चाहते हैं। हम लोगोंने दाक्षिणात्योंकी व्यावहारिक चतुराई की तारीफ की।" हे त्यांचे विधान परिस्थितीला मिळालेल्या सद्य:कालीन कलाटणीच्या पार्श्वभूमीवर अगदीच दिशाहीन वाटते.

(४) आसाम–नागालँडमधील आदिवासींची भूमिका वेगळीच आहे. त्यांचा हिंदीला विरोध नाही. (इंग्रजीलाही नाही.) आसामीला मात्र त्यांचा कट्टर विरोध आहे. त्यांची मूळभाषाच त्यांना मातृभाषा म्हणून विकसित व्हायला हवी आहे. आसामात विलीन न होता त्यांना स्वत्व टिकवायचे आहे. प्राथमिक शिक्षण स्वत:च्या भाषेत करून मग बाकी व्यवहारासाठी हिंदी वापरण्यास त्यांची तयारी आहे.

बस्स. या पुस्तकात असलेले मूलगामी विचार येवढेच. अर्थात हे विचार कमी महत्त्वाचे नाहीत. त्यांचेच जास्त विवरण आणि चर्चात्मक स्पष्टीकरण घडले असते तरी पुस्तकाचा दर्जा कितीतरी उंचावला असता. पण तसे झालेले नाही.

ज्या आठवणी सांगितल्या आहेत त्याही मनोरंजक, हृद्य करण्याकडे लेखकाने लक्ष दिलेले नाही. कै. सदाशिवराव वर्त्रे यांची कार्यतत्परता आणि योजकता, श्री. संजीव रेड्डींनी असभ्यपणे केलेला म. म. पोतदारांचा अपमान यांसारख्या एकदोन आठवणी याला अपवाद ठराव्यात. बाकी यथातथाच. ○


शेतीसाठीं
महाराष्ट्र बँक सहाय्य करते.
आपल्या नजिकच्या शाखेस भेट द्या
दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
११९ शाखासह आपल्या सेवेस सिद्ध
खते
बीयाणे




काऊंट मिरबाखच्या खुनामुळे जर्मन सरकार संतप्त होणे स्वाभाविक होते. या प्रकरणी आपण कसून चौकशी करू आणि गुन्हेगाराला शिक्षा देऊ असे सोव्हिएट सरकारने जर्मनीला आश्वासन दिले. परंतु ब्लुमाकीन हाती सापडू शकला नाही. लेनिन म्हणाला, 'ब्लुमाकीन सापडत नाही आणि जर्मन सरकारचा राग तर शांत करणं आवश्यक आहे. म्हणून डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाच्या अठरा-वीस सदस्यांना फाशी द्या. कोणाला तरी शिक्षा केली की झालं. जर्मन सरकार तेवढयावर सहज शांत होईल.

मध्यंतरीच्या काळात डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचा उरलमधील नेता मुरायेव्ह याने जर्मनीविरुद्ध उठाव करण्याची घोषणा केली होती. ११ जुलै १९१८ रोजी त्याने जर्मन सरकारला तार पाठवून आपला हा निर्णय कळविला. इतकेच नव्हे तर मॉस्को ताब्यात घेण्यासाठीही त्याची खटपट चालू झाली होती. मुरायेव्ह मॉस्कोवर चाल करून येणार आहे असे कळताच बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांनी त्याचा खून केला. मुरायव्हेच्या खुनामुळे डाव्या रेव्होल्युशनरी सोशॅलिस्ट पक्षाचा उठावाचा

उत्तरार्ध
लेखांक : पाचवा

## अद्यापही मॉस्को व पेट्रोग्राड सोडले तर बोल्शेव्हिक सत्ता इतरत्र स्थिर नव्हती

## आणि म्हणूनच आपली पोलादी पकड घट्ट करण्यासाठी लेनिनने दडपशाहीला सुरुवात केली.

## त्याच्या दृष्टीने तोच एक प्रभावी मार्ग होता

बेत जागच्या जागी विरून गेला. मात्र अद्यापही मॉस्को आणि पेट्रोग्राड ही दोन शहरे सोडली तर बोल्शव्हिकांची सत्ता इतरत्र स्थिर झाली नव्हती. मध्य रशिया, सायबेरिया, उरल, क्रिमिया आणि कॉकेशस हे विभाग बोल्शेव्हिक राजवटीला जुमानत नव्हते.

१९१७ च्या मार्चमध्ये पहिली क्रांति झाल्यापासून झारला आणि त्यांच्या कुटुंबियांना त्सारस्कोवे सेलो येथे नजरकैदेत ठेवण्यात आले होते. त्यानंतर वर्षभराने त्यांना एकाटेरिनबर्ग येथ हलविण्यात आले होते. १६ जुलै १९१८ रोजी झारला आणि त्याच्या कुटुंबियांना गोळ्या घालून ठार करण्यात आले. आपल्याला आज ठार करण्यात येणार आहे याची झार निकोलसला शेवटपर्यंत कल्पना नव्हती. मध्यरात्रीच्या वेळी झार निकोलस आणि त्याची बायको, मुलगा व चार मुली यांना उठविण्यात आले. श्वेत सैनिक आज रात्री या घरावर हल्ला करण्याचा संभव असल्यामुळे तुम्ही सारेजण भुयारात जा असे त्यांना सांगण्यात आले. निकोलस आणि त्याचे कुटुंबीय भुयारात गेल्यानंतर त्यांना सोव्हिएट सरकारचा हुकूम वाचून दाखविण्यात आला आणि त्या सर्वांवर पिस्तुले चालविण्यात आली.

पाच–दहा मिनिटांच्या आतच रोमानोव्ह घराणे नष्ट करण्यात आले होते. रशियन राजघराण्याचा शेवटचा अवशेष रक्ताच्या थारोळ्यात पडला होता.

तावडतोब त्या सर्वांची प्रेते कापडात गुंडाळून शहराबाहेर नेण्यात आली. झार निकोलसच्या मृत शरीराचे तुकडे–तुकडे करा असा मॉस्कोहून हुकूम आला अस-

त्यामुळे दोन दिवसपर्यंत हेच कार्य चालू होते. लोकांच्या भावना बोल्शेव्हिक राजवटीविरुद्ध चेतविण्यासाठी आपल्या शत्रूंना झारची हाडे वापरण्याची संधी मिळता कामा नये यासाठीच सोव्हिएट सरकारने हा हुकूम काढला होता. झार निकोलस आणि त्याचे कुटुंबीय यांच्या मृत शरीराचे बारीक तुकडे करून ते जाळून टाकण्यात आले. नंतर या मृत देहांची राख व हाडे लगतच्या जंगलात पुरण्यात आली आणि त्यावर बरीच माती व पाला–पाचोळा टाकण्यात आला.

झारला ठार मारण्यात आले आहे ही बातमी लेनिनला तारेने कळविण्यात आली आणि त्यानंतर दोन दिवसांनी ती प्रसिद्ध करण्यात आली. एकाटेरिनबर्ग येथून धाडलेली तार मॉस्कोला आली तेव्हा सोव्हिएटची बैठक चालू होती. आरोग्यमंत्री सेमाश्को याचे भाषण चालू असताना स्वेर्डलेव्ह तेथे आला आणि लेनिनच्या शेजारी जाऊन बसला. स्वेर्डलेव्हने लेनिनला तार दाखविली. लागलीच लेनिन उभा राहिला आणि म्हणाला, 'स्वेर्डलेव्ह आपल्याला एक महत्त्वाची बातमी सांगू इच्छीत आहे.'

सर्व प्रतिनिधींनी टाळ्या वाजवून स्वेर्डलेव्हचे स्वागत केले. नंतर स्वेर्डलेव्ह म्हणाला, 'झार निकोलस याला ठार करण्यात आले आहे अशी आताच एकाटेरिनबर्गहून बातमी आलेली आहे. निकोलसचा पळून जाण्याचा विचार होता. म्हणून त्याला ठार करण्यात आले. मला अशी अपेक्षा आहे की एकाटेरिनबर्ग सोव्हिएटच्या या कृतीला आपली मध्यवर्ती कार्यकारिणी मंजुरी देईल.'

लागलीच लेनिन म्हणाला, 'सेमाश्को याने आपलं भाषण पुढं सुरू करावं.'

निकोलसच्या फाशीबद्दल मध्यवर्ति कार्यकारिणीच्या बैठकीत चर्चा व्हावी ही गोष्ट लेनिनला पसंत नव्हती. म्हणून त्याने तशी संधी दिलीच नाही. स्वेर्डलेव्हचे निवेदन वाचून होताच त्याने जणू काही विशेष घडले नाही अशा थाटात बैठकीचे कामकाज सुरू केले.

निकोलसला ठार मारण्यात आले आहे ही बातमी १९ जुलैच्या 'इझवेस्तिया' मध्ये प्रसिद्ध करण्यात आली. या बातमीत पुढे असे म्हटले होते की 'निकोलस रोमानोव्हच्या बायकोला आणि मुलाला सुरक्षित जागी हलविण्यात आलेले आहे.' झारची बायको, मुलगा आणि चार मुली यांनाही ठार करण्यात आलेले आहे असे जर आताच प्रसिद्ध झाले तर अकारण लोकक्षोभ वाढेल म्हणून केवळ निकोलसलाच ठार करण्यात आल्याचे या बातमीत म्हटले होते. वस्तुस्थिति अशी होती केवळ निकोलसच्या कुटुंबियांनाच नव्हे तर त्याच्या चार नोकरांनाही ठार करण्यात आले होते. निकोलसचे आणखी सात आप्तेष्ट उरलमध्ये एका गावात राहत होते. निकोलसला ठार करण्यात आले आहे हे कळल्यानंतर या सातजणांनाही गोळ्या घालून ठार केले. पर्म येथे ग्रँड ड्यूक मिखाईल याला ठार मारण्यात आले.

अशा रीतीने अठ्ठेचाळीस तासांच्या आत बोल्शेव्हिक राजवटीने रोमानोव्ह घराण पूर्णतया नामशेष केले.

ट्रॉटस्कीने स्वेर्डलेव्ह याला विचारले, 'शाही घराण्यातला प्रत्येक माणूस ठार करण्याचा हा निर्णय कुणी केला ?"

स्वेर्डलेव्ह उत्तरला, 'आम्हीच. शाही घराण्याचा आश्रय घेऊन कोणीही आपल्या विरुद्ध उठाव करू नये म्हणून त्या घराण्यातला प्रत्येक जण ठार केला पाहिजे असं लेनिनचं मत होतं.'

ट्रॉट्स्कीने लिहिले आहे– 'निकोलसच्या गुन्ह्याकरिता त्याचे सर्व आप्तेष्ट ठार करण्यानं लेनिननं जुनी झारशाहीची परंपराच चालू ठेवली म्हणायची.'

संपूर्ण रोमानोव्ह घराण्याचा विनाश ही लेनिनच्या दृष्टीने जुन्या प्रतिज्ञेची पूर्तता होती. त्याने पूर्वीच लिहून ठेवले होते– 'राजे लोकांनी घटनेचा अवमान करता कामा नये याची त्यांना जाणीव करून देण्यासाठी जर इंग्लंडसारख्या सुसंस्कृत राष्ट्राला एक राजा ठार करावा लागला तर मग रशियात निदान शंभर रोमानोव्ह तरी ठार करायला काय हरकत आहे !'

आपल्या सर्व राजकीय प्रतिस्पर्ध्यांचा कठोर आणि निर्घृण उपाय योजून विनाश करणे हेच लेनिनचे या काळातील प्रमुख कार्य होते.

'चेका' या गुप्त पोलिस संघटनेचा एक अधिकारी लॅटसिस २३ ऑगस्टच्या 'इझवेस्तिया'मध्ये लिहितो– 'ज्यांनी कोणी आमच्याविरुद्ध शस्त्र उपसले असेल त्यांना नष्ट करून टाकणे हाच आजच्या यादवी युद्धामधला एकमेव कायदा आहे.'

'खेडेगावातील यादवी युद्ध' या लेखात लेनिनने लिहिले आहे– 'सोव्हिएट सरकारबद्दल ज्यांच्या मनात कमालीचा तिरस्कार आहे असा एक वर्ग या देशात अस्तित्वात असून लक्षावधी कामगारांचे हत्याकांड करण्याचे स्वप्न तो पाहत आहे. हा वर्ग जर सत्ताधीश झाला तर ठिकठिकाणी कामगारांचे मुडदे पडतील. भांडवलदार आणि जमीनदार यांची युती होऊन आज कामगारांना ज्या सोयी प्राप्त झाल्या आहेत त्या छिनावून घेतल्या जातील आणि त्याविरुद्ध आवाज उठविणाऱ्या कामगारांचा अमानुष छळ होईल. मी म्हणतो यात विवाद्य असे काहीही नाही. म्हणून भांडवलदारांच्या हस्तकांकडून आपला नायनाट होऊ नये अशी जर कामगारांची इच्छा असेल तर त्यांनी या मूठभर हस्तकांचे शिरकाण केलेच पाहिजे. यात मधला पर्याय संभवतच नाही. हे हस्तक मोठमोठ्या शेतजमिनी आपल्या ताब्यात घेऊन पुन्हा शेतकऱ्यांना गुलामांचे जिणे जगणे भाग पडावे असा प्रयत्न करीत आहेत. या हस्तकांविरुद्ध कठोर झुंज घेतलीच पाहिजे. मृत्यू हीच त्यांची खरी शिक्षा आहे. या हस्तकांना पाठिंबा देणाऱ्या पक्षाबद्दल कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या मनात पराकाष्ठेच्या तिरस्काराशिवाय अन्य कोणतीच भावना निर्माण होता कामा नये.

उजवे सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी आणि मेन्शेव्हिक या कामगारद्रोही पक्षांशीच आता डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाने हातमिळवणी केलेली आहे. भांडवलदारांच्या आणि जमीनदाराच्या या हस्तकांवर कामगारांनी पोलादी प्रहार केले पाहिजेत.'

आपल्या अनुयायांना आदेश देताना गोंडस शब्द वापरण्याचीही लेनिनला आवश्यकता वाटली नव्हती. त्याचे हुकूम अगदी सरळ भाषेत आणि थोडक्यात असत. ९ ऑगस्ट १९१८ रोजी त्याने काढलेला हुकूम लेनिनच्या स्वभावाचा द्योतक मानावयास हरकत नाही. या हुकमात लेनिन म्हणतो–' आपण निवडक आणि विश्वासू कार्यकर्त्यांची एक संघटना उभारावयास हवी. भांडवलदारांचे हस्तक, धर्मोपदेशक आणि श्वेतसैनिक यांचा नायनाट करण्यासाठी या संघटनेने सामुदायिक दहशतवाद आरंभिला पाहिजे. सर्व संशयित व्यक्तींना शहराबाहेरील छावण्यांमध्ये कोंडून ठेवावयास हवे. या हुकमाची अंमलबजावणी करण्यासाठी ठिकठिकाणी तारा करा.'

याच दिवशी लेनिनने निझनी नोव्होग्रॉड येथील सोव्हिएटला तार धाडली– ' निझनी नोव्होग्राडमध्ये श्वेतसैनिक उठावाची तयारी करीत असल्याची बातमी मला कळली आहे. आपण ताबडतोब एक अधिकारी मंडळ नेमून शहरात दहशतीचे वातावरण निर्माण केले पाहिजे. श्वेतसैनिकांना मद्य पाजून बेहोश करणाऱ्या शेकडो वेश्यांना गोळ्या घालून ठार करा. एका क्षणाचही विलंब होता कामा नये. आता कोणाचीही पर्वा करू नका वा कोणालाही दया दाखवू नका. प्रत्येक घराची झडती घ्या. दडविलेली शस्त्रे ताब्यात घ्या. मेन्शेव्हिकांची आणि त्यांच्यासारख्या शत्रूंची धरपकड करून त्यांना तुरुंगात बंद करा.'

दोन दिवसांनंतर लेनिनने आणखी एक तार धाडली– ' श्वेतसैनिकांचा उठाव मोडून काढण्यासाठी कोणताही कठोर मार्ग आचरायला घाबरू नका. दुकानदारांजवळील धान्यसाठा आपल्या ताब्यात घ्या. म्हणजे श्वेतसैनिकांवर उपासमारीची पाळी येईल. दुकानदारांनी आपल्याजवळचे धान्य सोव्हिएटच्या स्वाधीन करावे यासाठी त्यांची माणसे ओलीस ठेवा.'

लिव्हनो येथील सोव्हिएटला २१ ऑगस्ट रोजी धाडलेल्या तारेत लेनिन म्हणतो, ' तुम्ही भांडवलदारांच्या हस्तकांचा नायनाट केला याबद्दल अभिनंदन. या हस्तकांची मालमत्ता आणि अन्नधान्य जप्त करा व त्यांना गोळ्या घालून ठार करा. श्रीमंतांचे आप्तेष्ट तुमच्या ताब्यात घ्या म्हणजे ते आपल्या शत्रूंना मदत करण्याचे धाडस करणार नाहीत.'

आपल्या राजवटीची पोलादी पकड लहानशा खेडेगावापर्यंत पोचविण्यासाठी दडपशाहीचे थैमान घालणे लेनिनला नितांत आवश्यक वाटत होते. सत्ता दृढ करण्याचा तोच एक अपरिहार्य आणि प्रभावी मार्ग आहे याबद्दल त्याच्या मनात किंचितही संदेह नव्हता.

बोल्शेव्हिकांची हुकुमशाही राजवट प्रस्थापित झाल्यापासून लेनिनचा खून करण्याचे प्रयत्न होत असल्याच्या बातम्या अधूनमधून प्रसृत होत होत्या. त्याच्या दहशतवादाचा नंगानाच् सुरू झाला तेव्हा तर हा संभव अधिकच वाढला होता. १९१८ च्या जानेवारीमध्ये लेनिनच्या मोटारीवर एका अज्ञात व्यक्तीने गोळी झाडली होती. परंतु ती गोळी लेनिनऐवजी त्याच्या शेजारी बसलेल्या प्लॅटन या स्विस कम्युनिस्टाला लागली.

३० ऑगस्ट १९१८ रोजी मॉस्कोतील कामगारांच्या मळाव्यापुढे लेनिनचे भाषण होणार होते. या मेळाव्याला उशीरा आलेली एक स्त्री व्यासपीठाजवळ जाऊन बसली. आपले हात टेबलावर पसरून ती भाषणे लक्षपूर्वक ऐकत होती. तिचे धूम्रपानही सुरू होते. थोडचा वेळाने लेनिन येथे आला आणि थोडचा वेळातच त्याने आपले भाषण संपवले. तो व्यासपीठावरून खाली उतरला. हॅट व कोट आपल्या अंगावर चढविला आणि तसाच घाईघाईने तो सभागृहाबाहेर पडला. लेनिनच्या पाठोपाठ बराच श्रोतृसमुदायही सभागृहाबाहेर आला. सतत धुम्रपान करणारी ती स्त्रीही बाहेर पडली होती. लेनिन आपल्या मोटारीकडे जात असताना ती स्त्री सतत त्याला प्रश्न विचारीत होती. लेनिन मोटारीचे दार उघडणार तोच त्या स्त्रीने लेनिनवर तीन गोळ्या झाडल्या. लेनिन खाली कोसळला. लागलीच 'लेनिनचा खून झाला' असा एकच गलका उठला. परंतु तशा जखमी अवस्थेतही लेनिन उभा राहून गाडीत बसला आणि ड्रायव्हरला गाडी घरी नेण्यास सांगितले. गाडी क्रेमलिनच्या दिशेने धावू लागली होती.

लेनिनचा ड्रायव्हर लिहितो– 'गाडी सुरू झाल्यानंतर थोडचा वेळाने लेनिन एकदम पाठीमागे कलंडला. परंतु तरीही त्याच्या तोंडातून एक शब्द बाहेर पडला नाही. त्याचा चेहरा तेवढा उतरलेला होता. मित्रांच्या मदतीने लेनिन पुन्हा सरळ बसला. शेवटी आम्ही क्रेमलिनमध्ये पोचलो. लेनिन माझ्या खांद्यावर हात ठेवून चालत होता. त्याला खूप वेदना होत असल्या पाहिजेत हे त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होते. पण तरीही तो त्यासंबंधी काहीच बोलत नव्हता. मी विचारले, 'आम्ही तुम्हांला उचलून नेऊ काय ?' त्याने खुणेनेच नकार दिला. मी परत म्हटले, 'आम्ही तुम्हांला आत नेऊन ठेवतो.' तरीही त्याचा निश्चय कायम होता. तो म्हणाला, 'नको, मी स्वत: चालत जाऊ शकतो. हा तेवढा कोट काढून घे म्हणजे मला तेवढंच हलकं वाटेल.' मी लेनिनचा कोट काढून घेतला आणि नंतर तो माझ्या खांद्याचा आधार घेत तीन जिने चढून वर गेला. त्या वेळीही तो गप्पच होता. मी लेनिनचा हात धरून त्याला गादीवर झोपवले. मी त्याचा सदरा काढण्याचा प्रयत्न केला. परंतु जखमांमुळे सदरा अंगाला चिकटून बसला होता. त्यामुळे आम्हांला तो फाडून काढावा लागला.'

लेनिनला दोन गोळ्या लागल्या होत्या. एक त्याच्या मानेला चिकटून गेली होती

व दुसरीने गळयाच्या खालच्या भागावर लहानशी जखम केली होती.

लेनिनवर गोळया झाडणाऱ्या स्त्रीला जमावाने अटक केली होती. रात्री तिला लुबिआन्का येथील 'चेका'च्या कचेरीत आणण्यात आले. तेथे ती आपल्या जबानीत म्हणते, ' माझं नाव फान्या कापलान. आज मी लेनिनवर गोळया झाडल्या. हे कृत्य करण्याचं माझं मीच ठरविलं होतं. मला पिस्तुल कोठून मिळालं हे मी तुम्हाला सांगणार नाही. लेनिनला ठार करण्याचा माझा कित्येक दिवस विचार चालला होता. तो क्रांतीचा शत्रू आहे असं माझं मत आहे. पूर्वी झारच्या अधिकाऱ्याचा खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल मला हद्दपारीची शिक्षा झाली होती. मी अकरा वर्षे सक्तमजुरीची सजा भोगली. क्रांतीनंतर माझी सुटका झाली. घटना समिती बोलवायला हवी होती असं माझं प्रारंभीपासून मत होतं आणि अद्यापही तेच मत कायम आहे. माझे आईवडील १९११ मध्ये अमेरिकेत स्थायिक झाले. मला चार भाऊ आणि दोन बहिणी आहेत. आम्ही सारे जण कामगार आहोत. माझं सारं शिक्षण घरीच झालेलं आहे. होय. मीच लेनिनवर गोळया झाडल्या.'

३ सप्टेंबरला गोळया झाडून कापलानला ठार मारण्यात आले. लेनिनचा खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल बोल्शेव्हिक राजवटीने तिचा जगण्याचा अधिकार हिरावून घेतला होता. तिला ठार करणाऱ्या मालकोव्हने स्वेर्डलेव्हला विचारले. 'फान्याला कुठं पुरायचं ?'

स्वेर्डलेव्ह म्हणाला, ' तिला पुरायचं नाही. तिचे तुकडे तुकडे करून ते नाहीसे केले पाहिजेत. बोल्शेव्हिकांशी शत्रुत्व करणाऱ्या व्यक्तीचे हाडदेखील कुणाला दिसता कामा नये.'

ज्या दिवशी मॉस्कोमध्ये फान्या कापलानने लेनिनचा खून करण्याचा प्रयत्न केला त्याच दिवशी पेट्रोग्राडमध्ये कानेगिएस्सेर या ज्यू विद्यार्थ्याने 'चेका'च्या पेट्रोग्राड शाखेचा प्रमुख युरिटस्की याचा खून केला. यानंतर पेट्रोग्राड आणि मॉस्को या दोन शहरांमध्ये लाल सैन्याने एवढया मोठया प्रमाणावर अत्याचार सुरू केले की कोणत्या वेळी कोणावर धाड येईल याचा नेम उरला नव्हता. कम्युनिस्ट सदस्य आणि वरिष्ठ सेनाधिकारी यांना वगळून इतर सर्वांची धरपकड सुरू होती. अटक केलेल्या व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधि दिली जात नव्हती.

झिनोव्हेव्हने सैनिकांना चिथावणी दिली– 'बूर्झ्वा' लोक एकेका व्यक्तीचा खून करतात. आपल्याला मात्र तो सारा वर्गच एकदम नष्ट करून टाकायचा आहे.' झिनोव्हेव्हकडून एवढा इशारा मिळाल्यानंतर सैनिकांच्या अमानुषतेला सीमा उरली नव्हती. कानेगिएस्सेर याच्यावर खटला न भरताच त्याला ठार मारण्यात आले.

याशिवाय एकट्या पेट्रोग्राड शहरामध्ये ओलीस ठेवलेल्या पाचशे नागरिकांना एका आठवडाभरात गोळ्या घालण्यात आल्या.

गृहमंत्री पेट्रोव्हस्की याने नभोवाणीवरून भाषण करून सर्व स्थानिक सोव्हिएटना आदेश दिला– 'तुम्ही कोणाबद्दल दयामाया दाखवू नका. सर्व सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी कार्यकर्त्यांना ताबडतोब तुरुंगात टाका. 'बूर्झ्वा' समाजाने गडबड करू नये म्हणून त्यांच्यातील प्रमुख व्यक्तींना आपल्याजवळ ओलीस ठेवा. कोणी जरी किंचित विरोध केला तरी ताबडतोब सामुदायिक हत्याकांडाचा कार्यक्रम हाती घ्या प्रत्येक स्थानिक सोव्हिएटने या बाबतीत आपण होऊन पुढाकार घेतला पाहिजे व आपल्या विरोधकांना धडा शिकविला पाहिजे.'

बोल्शेव्हिक वृत्तपत्रेही आपल्या विरोधकांचे रक्त सांडण्याचीच भाषा बोलत होती पेट्रोग्राडमधल्या क्रास्नावागझेरने लिहिले-'आमचा एक माणूस ठार करण्यात आला तर शत्रूची हजार माणसं ठार मारली पाहिजेत. आतापर्यंत आम्ही बावळटासारखे वागून शत्रूची गय केली. पण शत्रू निर्दयी आहे हे आता तरी आम्ही ओळखलेच पाहिजे. आपणही आता कठोर आणि हृदयशून्य व्हायला हवे. आपण एकदाच असा पराक्रम गाजविला पाहिज की त्यायोगे रशियातील सारा 'बूर्झ्वा' समाज कायमचा नष्ट होईल.'

३१ ऑगस्ट १९१८ रोजी 'प्रावदा'ने लिहिले–' कामगारांनो आपण जर बूर्झ्वा समाजाचा नाश केला नाही तर तो समाज तुमचा नायनाट करील. बोल्शेव्हिक क्रांतीचा जो जो म्हणून शत्रू आहे, त्याला जमिनीत गाडून टाकण्यासाठी तयार व्हा. जे कोणी क्रांतीला विरोधी ठरणारी भाषा बोलत आहेत त्यांची तोंडे कायमची बंद करा. आजपासून कामगारांचा एकच मंत्र असला पाहिजे 'क्रांतीच्या विरोधकांचा विध्वंस.' प्रतिक्रांतीची भाषा बोलणाऱ्या पिसाळलेल्या कुत्र्याना गोळी घालून ठार मारले पाहिजे.'

बोल्शेव्हिकांच्या प्रतिस्पर्ध्यांचा नायनाट करण्यासाठी 'प्रावदा'सारखी बोल्शेव्हिक पत्रे दररोज असा आगलावा प्रचार करीत होती. दुसऱ्या एका अंकात 'प्रावदा'ने लिहिले होते–'कामगारांनो आणि गरीबांनो, हातात बंदूक घऊन गोळी कशी चालवायची हे शिकून घ्या. श्वेतसेनेचा बीमोड करण्यासाठी सिद्ध राहा. जे कोणी सोव्हिएट सरकारविरुद्ध आवाज काढतील त्याच्यावर बेछूट रीतीने बंदूक चालवा. तुमच्या विरुद्ध जो हात उचलील त्याला दहा गोळ्या मारा म्हणजे तो हात कायमचा खाली कोसळेल.'

२ सप्टेंबरला निझनी नोव्होग्राड येथील 'चेका'ने ओलीस ठेवून घेतलेल्या लोकांपैकी सेहेचाळीस जणांना ठार मारले. तेथल्या 'वर्कर्स अँड पेझंट्स गॅझेट'ने लिहिले, 'एका कम्युनिस्टाचे रक्त सांडले तर आम्ही दहा जणांचे रक्त घेऊ. कारण आमच्या

रक्ताचा सूड घ्या असेच प्रत्यक कम्युनिस्टाचे सांगणे असते. पेट्रोग्राडमध्ये ओलीस ठेवलेल्यांपैकी पाचशे बारा जणांना या ना त्या कारणाने ठार करण्यात आले आहे.'

१८ सप्टेंबरला पेट्रोग्राड येथे बोलताना झिनोव्हेव्ह म्हणाला, 'आपल्या शत्रूंचा नायनाट करण्यासाठी आपल्याला समाजवादी लष्कर हवे. दहा कोटी रशियन नागरिकांपैकी नऊ कोटी नागरिकांना आपण आपल्या बाजूस वळवून घेतले पाहिजे. म्हणजे मग उरलेल्या एक कोटी लोकांची पर्वा करण्याचे आपल्याला काहीच कारण नाही. आपण त्यांना सहज नष्ट करू शकू.'

प्रतिस्पर्ध्यांना ठार करण्यात बोल्शेव्हिकांचे आसुरी समाधान साठविलेले होते.

२३ सप्टेंबर १९१८ रोजी आपल्या पत्नीला धाडलेल्या पत्रात कासिन लिहितो– 'लेनिनचा खून करण्याचा प्रयत्न झाल्यापासून रशियात भीषण दहशतवादाचा कालखंड सुरू झालेला आहे. मॉस्को आणि पेट्रोग्राड या दोन शहरांत सहाशे ते सातशे नागरिकांना ठार मारण्यात आले. यांपैकी बहुसंख्य लोकांना केवळ संशयावरूनच पकडण्यात आले होते. ग्रामीण भागातही सामुदायिक धरपकडी आणि हत्याकांडे यांचे सत्र चालूच आहे.'

'बूर्झ्वा' वर्ग नष्ट करण्याच्या नावाखाली कम्युनिस्टांनी हे अत्याचार चालविले होते. बूर्झ्वा कोण याबद्दलची त्यांची व्याख्याही अगदी सोपी होती. जो कम्युनिस्ट नाही तो बूर्झ्वा असे समजून त्याचे शिरकाण होत असे.

लॅटासिस लिहितो– 'बूर्झ्वा वर्ग नष्ट करून टाकण्याचा आम्ही चंग बांधला आहे. अमका एखादा गृहस्थ सोव्हिएट सरकारच्या विरुद्ध बोलत आहे किंवा कृती करीत आहे याचा पुरावा शोधत बसण्याचा त्रास घेण्याचे कारण नाही. एखाद्याला पकडले की सरळ त्याला विचारा: 'तू कामगार आहेस की नाही? तू कुठला राहणारा? तुझं शिक्षण किती झालंय? तुझा व्यवसाय काय?' या प्रश्नाचो तो जी उत्तरे देईल त्यावर त्याला ठार करायचं की नाही हे ठरवा. कम्युनिस्टांच्या लाल दहशतवादाचे स्वरूप हे असे आहे.' प्रत्यक्षात लॅटासिसने सांगितलेल्या कसोटीपेक्षाही अधिक सोपी कसोटी लावून बूर्झ्वा की कम्युनिस्ट या प्रश्नाचा निकाल करण्यात येत होता. सोस्नोव्हस्की हा सोव्हिएट पत्रकार लिहितो– '१९१८ मध्ये मॉस्को सोव्हिएटच्या कचेरीत भरलेली एक बैठक मला आठवते. एखादी व्यक्ति कम्युनिस्ट आहे की नाही हे ठरविण्याचे काम न्यायालयाकडे सोपवावे की 'चेका'कडे सोपवावे यासंबंधी चर्चा चालली होती. काहींचे म्हणणे असे होते की न्यायालयामार्फत या प्रश्नाचा निर्णय केला की निरपराध व्यक्तीवर अन्याय होण्याची शक्यता उरत नाही, त्यामुळे ही सर्व प्रकरणे न्यायालयाकडे सोपवावीत. उलट लॅटासिसचे म्हणणे असे होते की एखाद्या व्यक्तीचे नाव, मूळ ठिकाण, शिक्षण आणि व्यवसाय विचारला की त्यावरून तो कम्युनिस्ट आहे की नाही याचा 'चेका' सहज निर्णय करू शकते.

या वेळी मुझिकिन नावाचा एक कामगार उठला आणि म्हणाला, ' एवढे प्रश्न तरी कोण विचारीत बसतो ? मी तर सरळ एखाद्या घरात शिरतो आणि त्याची मांडी-कुंडी पाहतो. त्या भांड्यात मांसाचे चवदार पदार्थ आढळले की त्या घरात लोक-शत्रू राहत आहेत असे मी ठरवितो आणि त्याचा निकाल लावतो.'

युक्रेनमधल्या क्रूर दहशतवादाबद्दल अँगेलिका बालाकानोव्ह या पक्ष–कार्यकर्तीने लेनिनकडे तक्रार करताच छद्मी हास्य करीत लेनिन म्हणाला, 'बोल्शेव्हि-कांच्या दृष्टीनं तुझी उपयुक्तता संपली आहे असंच यावरून दिसतं.'

काही मेन्शेव्हिक कार्यकर्त्यांना अकारण फाशी देण्यात आले म्हणून अँगेलिकाने लेनिनशी बोलताना नापसंती केली. तेव्हा लेनिन उत्तरला, 'आम्ही जर या मूठभर पुढाऱ्यांना ठार केलं नाही तर उद्या आम्हांला हजारो कामगारांवर गोळ्या चाल-विण्याचा प्रसंग येईल एवढं तुला समजत नाही का?'

'चेका'च्या अधिकाऱ्यापुढे बोलताना लेनिन म्हणाला होता, 'आपण निरपराध लोकांना ठार करतो अशी तक्रार कधीकधी मला ऐकू येते. परंतु चुका केल्यानंच शहाणपण येतं हे या तक्रारखोरांना का समजू नये ? बोल्शेव्हिक हुकुमशाही 'चेका'-मुळे बलिष्ठ होत आहे याचेच काही जणांना वैषम्य वाटत असल्यामुळे ते असली अर्थ-शून्य टीका करीत आहेत. ही टीका ऐकली की क्षुद्र बुद्धिजीवी वर्गाचे ते वायफळ बोलणं आहे असंच मी धरून चालतो. 'चेका'मध्ये काही अनिष्ट प्रवृत्तीचे लोक घुसले असतील हे मी समजू शकतो. आपण आपापसात विचारविनिमय करून त्यांना हाक-लून देऊ. परंतु त्यामुळे संपूर्ण 'चेका' यंत्रणेवर टीका करणं चुकीचं आहे. कारण 'चेका'मुळेच कामगारांची हुकुमशाही प्रस्थापित होत असून तिचे हे कार्य फार महत्त्वाचं आहे. जनतेच्या शत्रूंना नष्ट करण्यासाठी हिंसाचाराशिवाय मार्गच नसतो. 'चेका' नेमकं हेच काम करीत आहे आणि म्हणून ती श्रमिक जनतेची फार मोठी सेवा करीत आहे असंच मी मानतो.'

कामगारांच्या हुकुमशाहीच्या नावाखाली 'चेका'चे पोलीस मोकाट सुटले होते. माणसाच्या जीवनाला कोणतीच प्रतिष्ठा उरली नव्हती.

लेनिनलाही नेमके तेच हवे होते.

(क्रमशः)

## ☐ बांधेसूद देश

बांधेसूद माणूस चांगला दिसतो, तेव्हा बांधेसूद देशही चांगला दिसणार हे ओघानेच आले. आपल्या हिंदुस्थानाचेच पाहा. वीस वर्षांपूर्वी हा देश इतका अस्ताव्यस्त पसरला होता की लठ्ठं-भारती भारत स्वतःच्या पायावर कसा उभा राहणार याची आपल्याला काळजी पडली होती. पण सत्तेचाळीसच्या डायटिंग कोर्समध्ये बरीचशी चरबी झडून गेल्यामुळे आताचा हिंदुस्थान कसा बांधेसूद दिसतो नाही का ? या राष्ट्रीय स्लिमिंगच्या फॅशनचे एक अजब उदाहरण नुकतेच दिसले. परवा वर्तमानपत्रात वाचले की, या महिन्याच्या अखेरीला पॅसिफिक महासागरातले एक बेट म्हणे स्वतंत्र देश होणार आहे. हे बेट किती मोठे आहे ? आठ चौरस मैल ! अन् त्याची लोकसंख्या किती आहे ? साडेपाच हजार ! पाहिलेत ? इतका स्लिम देश दुसरा असू शकेल काय ? मागे हिंदुस्थानात राज्यपुनर्रचना झाली तेव्हा आपल्या गल्लीचेही वेगळे प्रांतराज्य व्हावे अशी टूम आपले बोळ-नेते घालूअण्णा यांनी काढली होती. पण आमच्या गल्लीत चिवड्याचे दुकान किंवा रसवंती असं एकही टूरिस्ट ॲट्रॅक्शन नसल्याने प्रस्तुत प्रांतराज्याला आर्थिक स्वायत्तता लाभणे कठीण, सबब ही मागणी न्याय्य असली तरी सोडून द्यावी असे ठरले होते. पण आता घालूअण्णांच्या नेतृत्वाखाली समस्त बोळकरांनी स्वातंत्र्याची गर्जना केली तर नवल नाही. कारण चिमूटभर फौज थोड्या दिवसांनी स्वतंत्र देश म्हणून यूनोचा सभासद झाला की जागतिक महत्त्वाच्या प्रश्नांवर मतदान करणार — न जाणो, पुढे मागे नौरूच्या एका मतावर जगात शांतता नांदावी की युद्ध पेटावे हे ठरणार. मग आमच्या बोळानेच काय पाप केले आहे ? बस, ठरले; आमचा बोळ यूनोचा सभासद झालाच पाहिजे. आता एवढे मात्र खरे की नौरूला ज्याप्रमाणे रशिया व अमेरिका या दोन प्रबळ देशांपैकी कोणाच्या गोटात जायचे हे ठरवावे लागेल त्याप्रमाणे आमच्या गल्ली-राज्यालाही दादर आणि गिरगाव या स्वतंत्र, सार्वभौम व एकमेकांचे शत्रू असलेल्या देशांपैकी कोणाच्या गोटात जायचे याचा विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागेल.




यूनोचा सभासद

## ◻ डुकराची हृदयेश्वरी

विनोबा-प्रणीत हृदय-पालटाचे तंत्र आपल्याला कधी फारसे पटले नव्हते. पण हल्लीच्या राजकारणी मंडळींनी सकाळ-संध्याकाळ पक्ष-पालटाची जादू चालविलेली पाहून वाटले की माणसाने आठवड्यातून फक्त एकदाच हृदय-पालट करावा असा कडक कायदा करण्यात यावा. ते काही असले तरी दक्षिण आफ्रिकेतल्या एका डॉक्टरने अक्षरशः एका माणसाचे हृदय दुसऱ्या माणसात बसवून तो हृदय-पालट घडवून आणला आहे, तो पाहिल्यावर अशी खात्री पटते की यापुढे हृदयेश्वरीला हृदय देणारा प्रेमवीर "हे माझे स्वतःचेच आहे, दुसऱ्याचे उसने आणलेले नाही" अशी तिची आळवणी करील. पण प्रस्तुत डॉक्टरने एक मोठी अडचण मांडली आहे, ती म्हणजे मानवी हृदय हवे तेव्हा मिळेलच असे नाही. त्याच्या मते माकडाचे हृदयही तितकेसे योग्य नाही. – पण डुकराचे हृदय मात्र चालू शकेल. तोबा तोबा ! डुकराचे हृदय लावलेला माणूस ! देवाने दिलेले हृदय असतानाच माणसाने जगात इतकी घाण करून ठेवली आहे, की डुकराने दिलेले हृदय लावल्यावर आणखी किती उकिरडा होईल कोण जाणे !

## ◻ चंद्रावरची कांद्याची चाळ

काही रशियन शास्त्रज्ञांनी असा अजब शोध लावला आहे की अंतरिक्ष-यानात कांदे पाठविले तर त्यांची वाढ चांगली होते. कमाल आहे ! आपल्या डोक्या-खेरीज इतर कोठेही कांद्यांची वाढ चांगली होईल असे मला वाटले नव्हते. पण एक आमचे डोके सोडले तरी जमिनीत बी लावून खतपाणी घातले की कांदेच काय कोठलेही पीक येते अशी आमची समजूत होती. पण या अशा बुरसटलेल्या कल्पनेमुळेच हिंदुस्थानाच्या शेतीत सुधारणा झालेली नाही. आधुनिक माणूस अंतरिक्ष-प्रवासाचा प्रयत्न करण्यात गुंतला आहे, कुत्रे व माकडे अंतरिक्षात जाऊन आली आहेत, इतकेच काय पण माश्यादेखील जाऊन आल्या आहेत, मग कांदे, गाजर, मुळे मागे का राहावेत? निदान हल्लीचे कांदे इतके मॉडर्न झाले आहेत की पृथ्वीवरच्या कांदेवाडीला शह म्हणून लवकरच चंद्रावर कांदेवाडी तयार होणार असे दिसते. आता या रशियन शास्त्रज्ञांनी अंतरिक्ष-प्रवासाला कांदेच का पाठविले– बटाटे का पाठविले नाहीत, याचा उलगडा मात्र माझ्या डोक्यातल्या कांदे-बटाटयांना होऊ शकत नाही.

○





माधवराव । सदानंद जोशी

रणजित देसाई यांची 'स्वामी' प्रकाशित झाली आणि लोकप्रियतेचा एक नवीन उच्चांक या कादंबरीनं गाठला. त्याच वेळी वाटलं होतं 'स्वामी' वर आधारित एखादं नाटक अथवा चित्रपट जरूर पाहावयास मिळेल, परंतु प्रत्यक्षात स्वामी रंगभूमीवर आली ती कादंबरीकथनाच्या स्वरूपात.

कादंबरीकथन हा प्रकार आपल्याकडे नवीन. त्यात स्वामीभोवती स्वतःचे असे तेजोवलय आणि कार्यक्रम सादर करणारे सदानंद जोशी यांच्या नावीन्याच्या हव्यासाचा बोलबा, या कारणामुळे स्वामी पाहण्यास व ऐकण्यास विलक्षण उत्सुक होतो.

कादंबरीकथन – आणि तेही नाटचपूर्ण पद्धतीने व एकाच व्यक्तीने करावयाचे

। रं ग भू मी ।

# स्वामी

## एकपात्री नाट्यरूप दर्शन

म्हटल्यावर ज्या काही मर्यादा पडतील त्या लक्षात घेऊन श्री. जोशी यांनी आपली 'स्वामी' ची कथन आवृत्ती तयार केली आहे. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचे चरित्रकथन हा महत्वाचा हेतू असल्याने त्यांच्या व्यक्तिवैशिष्टयाचे प्रभावी दर्शन घडवणाऱ्या अनेक घटना सदानंद जोशी मोठ्या नाटयपूर्ण रीतीने कथन करतात. प्रभावी व लोकहितदक्ष शासनकर्ता म्हणून माधवराव डोळ्यांत भरतात ते विसाजीपंत लेले प्रकरणात त्यांनी घेतलेली भूमिका, व रास्ते मामांच्या बंडाच्या संदर्भात मातुश्री गोपिकाबाईंचा बदसल्ला धुडकावून लावण्याच्या त्यांच्या निर्णयामुळे. हे दोन्ही प्रसंग त्यातल्या बारीकसारीक छटांसह सदानंद जोशी प्रेक्षकांपर्यंत पोचवतात. रास्ते मामांचा दंड रद्द करण्याची आईची सूचना धुडकावून लावताना माधवरावांच्या मनाला अनंत यातना झाल्या. एक मातृभक्त पुत्र आणि राज्याचा पालनकर्ता या नात्याने पार पाडावी लागणारी जबाबदारी त्यांच्यामधील संघर्ष जोशी मोठ्या हळुवारपणे खुलवून दाखवतात. मातृनिष्ठा आणि कर्तव्यनिष्ठा, या दोन्ही भावनांतील संघर्ष केवळ शब्दसामर्थ्यावर सूचित करण्याची अवघड कामगिरी जोशी समाधानकारक पद्धतीने बजावतात.

राघोबा आणि श्रीमंत यांच्यामधील अनेक प्रसंग मग ते कौटुंबिक असोत, वा

राजकीय चर्चेचे असोत, जोशी मोठ्या कौशल्याने हाताळतात.

क्षयाचा विकार बळावत जाऊन श्रीमंत थेऊरला गेले. यातना दररोज वाढत होत्या. स्वतःसाठी नव्हे तर दौलतीसाठी आणखी चार वर्षांचे आयुष्य दे, अशी श्रीचरणी श्रीमंतांनी केलेली प्रार्थना वाया गेली. आणि थेऊर मुक्कामी श्रीमंतांनी देह ठेवला. थेऊरला पोचल्यापासूनचा काळ श्रीमंतांना अत्यंत तापदायक गेला. घरामध्ये रमेखेरीज विश्वासाचे कोणी नाही, काका मरणाची वाट पाहत बसलेला, तरीही दौलतीच्या चिंतेने पछाडलेल्या या पेशव्याची मनोव्यथा शब्दांच्या पलीकडे जाते. थेऊरचा हा सर्व भाग जोशी विलक्षण ताकदीने साकार करतात. स्थलाकाळाच्या मर्यादा ओलांडून प्रेक्षकांना पेशवेकालीन थेऊरामध्ये नेण्यात जोशी यशस्वी झाले आहेत.

## सखोल अभ्यास

माधवरावांच्या मृत्यूनंतर रमाबाई सती जातात. निवेदन व ध्वनिमुद्रित टेपच्या आधारे जोशी हा भाग दाखवतात खरे, परंतु इथे मात्र ते यशस्वी होत नाहीत. श्रीमंतांचा मृत्यू पाहिलेले प्रेक्षक रमाबाईंच्या सती-गमनाच्या वर्णनाचे श्रवण करण्याच्या मनःस्थितीत राहत नाहीत.

कादंबरीकथनामध्ये माधवराव केंद्रबिंदू धरून जोशी यांनी अनेक पात्रे उभी केली आहेत. राघोबा, रामशास्त्री, गंगोबा तात्या, रमा व गोपिकाबाई या प्रमुख व्यक्तिरेखा. याखेरीज डोकावून जातात, ते विसाजीपंत लेले, रास्ते मामा, रामजी आणि अन्य बारीक सारीक व्यक्तिरेखा. यांतील प्रत्येक व्यक्तिचित्राचा व त्या विशिष्ट व्यक्तीचा माधवरावांच्या कार्यकर्तृत्वावर घडलेल्या परिणामांचा जोशी यांनी सखोल अभ्यास केला आहे.

स्वामी कादंबरीकथनाच्या या कार्यक्रमाचे दिग्दर्शन केले आहे श्री. प्रभाकर गुप्ते यांनी. या उपक्रमासंबंधी मी त्यांची मुद्दाम भेट घेतली. सदानंद जोशी यांच्या या कार्यक्रमासंबंधी बोलताना ते म्हणाले, कादंबरीकथनामध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिरेखेचा आम्ही सखोल अभ्यास केला. श्रीमंत वागत कसे असतील, बोलत कसे असतील, निरनिराळ्या व्यक्तींशी बोलताना–वागताना त्यांचा दृष्टिकोन कोणता असेल, याचे आडाखे आम्ही बांधले.

स्वामी कादंबरीकथन म्हणजे माधवराव पेशवे यांचे चरित्र-कथन एवढे निश्चित होते. हा उद्देश पूर्ण होईल, अशी स्वामीची कथन आवृत्ती श्री. जोशी यांनी तयार केली होती. चार जुलै १९६० पासून तालमी सुरू झाल्या. तासन तास चर्चा आणि अखंड मेहनत यांच्या आधारे कार्यक्रम उभा राहू लागला. प्रत्येक व्यक्तिरेखची मानसिक ठेवण लक्षात घेऊन त्या व्यक्तिरेखेला साजेशी संवाद बोलण्याची धाटणी, चेहऱ्यावरील हावभाव, रंगभूमीवरील हालचाल निश्चित करण्यात आली.

एकाच व्यक्तीने सलग तीन तास उभे राहून हा कार्यक्रम सादर करावयाचा

असल्याने संवाद बोलण्याची ताकद हा महत्त्वाचा भाग होता. केवळ शब्दसामर्थ्यावर क्षणात राघोबा तर क्षणात माधवराव, आणि लगेच त्याच ठिकाणी त्याच वेळी रमाबाई उभ्या करणे आणि प्रेक्षकांना ही स्थित्यंतरे मानवतील, अशा पद्धतीने ' स्वामी ' रंगभूमीवर उभी करणे हीं काही साधी गोष्ट नव्हती. ईप्सित साध्य करण्यासाठी जोशी अहोरात्र मेहनत घेत होते.

प्रयोग होण्यापूर्वी अनेक अडचणी आमच्या समोर होत्या. श्री. गुप्ते सांगत होते, कार्यक्रम सादर करावयाचा कसा ? वेषभूषा वापरावयाची का नाही ? श्रीमंत माधवराव म्हणून वावरणारी व्यक्ती क्षणात रमाबाईंचे संवाद बोलू लागली – आणि तीही पेशव्यांच्या वेषभूषेत तर ते प्रेक्षकांना मानवेल का ?

कितीही कौशल्याने व यशस्वीपणे कार्यक्रम सादर केला तरी सतत तीन तास पर्यंत श्री. जोशी प्रेक्षकांना खिळवून ठेवू शकतील काय ?

यशाच्या दृष्टीने पार्श्वसंगीत, गाणी अशी काही तडजोड स्वीकारावी काय ? अंक कसे व कोठे पाडायचे ? एक ना अनेक शंका.

सतत सरावाने जोशी यांचा स्वतः-बद्दलचा आत्मविश्वास वाढू लागला. आम्हांलाही हा उपक्रम ते यशस्वी करतील अशी खात्री वाटू लागली. आणि मगच या तांत्रिक बाबीवर आम्ही निर्णय घेतले.

रंगभूमीवर प्रत्यक्ष वावरणार कादंबरीकथनाचे नायक श्रीमंत माधवराव. तेव्हा त्यांच्याच वेषात सदानंदांनी वावरावे असे ठरले. राघोबापासून रामजीपर्यंत सर्वांचे संवाद बोलताना व्यक्तिरेखेतील फरक दाखवायचा तो केवळ शब्दसामर्थ्यावर. व्यक्तिरेखा जिवंत करणारी संवादाची घटना हा महत्त्वाचा भाग होता, आमची कसोटी होती, ती रमा आणि गोपिकाबाई यांच्या संवादाच्या वेळी. परंतु पेशवाई शिरपेच घालून वावरणारे माधवराव, जाऊन त्याच वेषात रमा बोलू लागली. प्रेक्षकांना हा बदल – केवळ शब्दसामर्थ्यावर जाणवला, किंबहुना आव-


शरीर आणि मन
भक्कम बनविण्यासाठी
¤
स्त्रीपुरुषांच्या सर्व अवयवांची
डौलदार वाढ व
स्नायूंच्या मजबुतीकरिता
¤
अर्कशालानिर्मित
मकरध्वजयुक्त
च्यवनप्राश
एकमेव शक्तिवर्धक
तज्ज्ञांनी प्रशंसिले आहे
आयुर्वेदीय
अर्कशाला लि.
सातारा
दूरध्वनी) (५३५

डला. रमेचे अथवा गोपिकाबाईंचे संवाद बोलताना कोणतीही फाजिल बायकी हाल-चाल होणार नाही, याची कटाक्षाने दक्षता घेण्यात आली. आणि संयमामुळेच जोशी यश मिळवू शकले. कथा-कथनामध्ये सुसूत्रता यावी म्हणून निवेदकाचे पात्र उभे करण्यात आले. निवेदकाला कथेमध्ये स्थान नाही हे खरे. मात्र त्रयस्थाच्या भूमिके-तून वावरणारा हा निवेदक कथाश्रवणामध्य निर्माण होणाऱ्या प्रेक्षकांच्या भावना अचूक टिपतो आणि म्हणून त्याच्या निवेदन—बोलण्याच्या पद्धतीतून त्याचे माधव-रावांसंबंधीचे प्रेम तर व्यक्त होते. माधवरावांनी विजय मिळवला, तर त्याला संतोष होईल, माधवरावांच्या पराभवाने तो व्यथित होईल, राघोबाच्या घरभेदी-पणाचा त्याला संताप येईल. पेशवाईचे वर्णन तो मोठ्या अभिमानाने करील, हे सर्व करीत असताना त्याच्या स्वाभाविक मर्यादांचे उल्लंघन होणार नाही, एवढी तो दक्षता घेईल.

## मर्यादा

सदानंद जोशी यांच्या या प्रयोगासंबंधी तुमचे मत काय? असे मी श्री. गुप्ते यांना विचारले, ते म्हणाले– "या उपक्रमाचा एकपात्री प्रयोगामध्ये समावेश करणे चूक ठरेल, नाटयगुणांचा हा नवीनच प्रकार रंगभूमीवर येत आहे."

जोशी यांचा 'स्वामी' कथनाचा प्रयोग पाहिल्यावर या प्रयोगाला 'कादंबरी-कथन' म्हणणे पटत नाही. या कार्यक्रमामध्ये केवळ कथन नाही. कथनापेक्षाही त्यात रंगभूमीशी जवळीक करणाऱ्या अनेक बाबी आहेत, असा कार्यक्रम या पद्धतीने सादर करावा की नाही हाही वादाचा मुद्दा होऊ शकेल. मात्र कोणत्याही परि-स्थितीत जोशी जो कार्यक्रम करतात, ते कादंबरीकथन नव्हे.

'स्वामी कादंबरीचे एकपात्री नाटयरूप दर्शन,' असे या कार्यक्रमाचे वर्णन करणे सुयोग्य ठरेल; अर्थात अशा कार्यक्रमावर पडणाऱ्या बहुविध मर्यादा याही कार्यक्रमावर पडत असल्याने जोशी यांचे यश मोठे असले तरी या उपक्रमामुळेच येणाऱ्या स्वाभाविक मर्यादा त्यांच्या कार्यक्रमासही पडतातच हे विसरून चालणार नाही.

श्री. सदानंद जोशी माधवराव म्हणून उभे राहतात. अत्यंत तेजस्वी डोळे व सडपातळ देहयष्टी, ही माधवरावांची शारीरिक वैशिष्टये सर्वमान्य आहेत. जोशी यांच्यामध्ये या बाबी नाहीतच, परंतु त्यांचे वयही त्यांच्या या भूमिकेआड येते.

बहुढंगी व्यक्तिरेखा ते कौशल्याने शब्दसामर्थ्यावर साकार करतात. परंतु वाणी-वरील प्रभुत्व जोशी यांच्याजवळ नाही. पण या मर्यादांची श्री. जोशी यांनाही जाणीव आहे. आणि त्या लक्षात घेऊनच जोशी आपला प्रयोग सादर करतात.

एक वेगळा प्रयोग म्हणून सदानंद जोशी यांच्या 'स्वामी' चे रसिकांनी हा प्रयोग, प्रयोग म्हणून पाहून स्वागत केले पाहिजे असे सुचवावेसे वाटते.

—शरद गोखले

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

**श्री. गो. जोशी, सायनाचार्य**

## मार्च महिन्याचे भविष्य

**मेष :** व्ययस्थानी अनेक अनिष्ट ग्रह जमू लागले आहेत. परिस्थिती गंभीर आहे. पण निराशाजनक खास नाही. पाचव्या गुरूच्या सदिच्छा घेऊन आपणांस वाटचाल करावी लागणार आहे.

३ मार्चचा शनी मंगळ योग आणि १५ मार्चचा राहू मंगळ योग आपल्या प्रगतीच्या मार्गाला खीळ घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करू लागतील. आपण दूरदर्शीपणाने, निर्धाराने कार्यप्रवृत्त झालात तर, सर्व अनिष्ट ग्रहांची कारस्थाने आपण उधळून लावाल असा मला विश्वास वाटतो.

मार्चच्या दुसऱ्या पंधरवडयात कार्यक्षेत्रात बरीच झटापट होईल. या संघर्षात शेवटी आपलाच विजय होईल हे जरी खरे असले तरी, हा सारा महिना विशेष दक्षतेने काढावा लागणार आहे. व्यापारी अंदाज चुकतील. नोकरी धंद्यातील प्रगतीच्या संधी हुकतील, प्रकृतीलाही सदैव जपायला हवे.

दि. ८ ते ११, २२ ते २८ मार्च या काळी आपणांस झगडून विजयी होता येईल.

**वृषभ :** पूर्वीच आपणांस बजावले आहे की, लाभस्थानी जमलेली आणि जमणारे अनेक स्फोटक ग्रह आपणांस सर्वस्वी अनुकूल ठरणार नाहीत.

इष्टमित्र दगा देतील, नोकरचाकर हातोहात बनवतील, हितचिंतकांनी दिलेली आश्वासने साफ खोटी ठरतील. अपयश–अप्रतिष्ठा–अनारोग्य असे काहीही घडणार नाही, पण मानसिक स्वास्थ्य मात्र हरवल्यासारखे जाणवायला लागेल.

व्यावसायिक क्षेत्रात अशांतता माजेल, सामाजिक क्षेत्रात तर कोणत्याही क्षणी ठिणगी पडेल. सौजन्याने, जुळतेमिळते घेण्याच्या प्रवृत्तीने वागलात तरच या महिन्यातील अनिष्टतेचा आपणांवर फारसा परिणाम होऊ शकणार नाही.

फार मोठे व्यवहार करण्याचे शक्यतो टाळा. दि. ४ ते ७, १५ ते १९,२४ ते २७ मार्च या वेळी बऱ्याचशा अपेक्षा सफल व्हाव्या.

**मिथुन :** सूर्य भाग्यस्थानी आलेला आहे. आणखीही ग्रह भाग्यस्थानाकडे वाटचाल करीत आहे. हे सारे ग्रह अमाप उत्साह देतील, अनेकांचे हार्दिक सहकार्यही मिळवून देतील पण अंगीकृत कार्यात यश मात्र माफकच मिळेल. असं व्हायला कारण शनिमंगळांची कारस्थाने.

आगामी १५।२० दिवसांत वरिष्ठांची मने आपल्या बाबतीत कलुषित बनतील,

वडिलधाऱ्या व्यक्तींचे एकाएकी आरोग्य बिघडेल, व्यावसायिक क्षेत्रांतील अनेक पेचप्रसंगांना तोंड द्यावे लागेल.

पहिला पंधरवडा काहीसा अनुकूल. पण दुसऱ्या पंधरवड्यात मात्र प्रत्येक गोष्टीत मागे पाय ! खर्चाला तर ताळतंत्रच राहणार नाही. स्थावराचा प्रश्न अधिक चिघळेल, पैशाआडक्यासाठी अनेकांचे पाय धरावे लागतील.

दि. ४ ते ६, १७ ते २२, २५ ते ३० थोडेफार यश मिळेल याच काली.

**कर्क :** हा साराच महिना खूपच धाईगर्दीचा–धावपळीचा जाणवेल. अनंत कामे हातावेगळी करावी लागतील. स्थगित कामांना गती द्यावी लागेल, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत सतत आघाडीवर राहावे लागेल. तुम्हांपैकी काही व्यक्तींना परदेशच्या प्रवासाची तयारी करावी लागेल.

या वेळचे शनिमंगळासारखे उग्र ग्रह कुणाला कसेही असले तरी तुम्हांला मात्र ते घवघवीत यश देणारे जाणवतील. या अनन्यसाधारण ग्रहस्थितीचा आपण फायदा उठवलात तर तुमच्या जीवनइतिहासात एक नवा अध्याय लिहिला जाईल. यांत्रिक विद्युत् क्षेत्रांत पर्वकाळ लाभल्यासारखे वाटेल, स्थावराचा प्रश्न सुटेल, उच्च अधिकार लाभेल, नवे क्षेत्र हाती गवसेल. कौटुंबिक मंगल कार्याचे निश्चित ठरेल. दि. १ ते ७, १७ ते २३, २८ ते ३१ या वेळी चिरंतनस्मृतीच्या अनेक घटना घडतील.

**सिंह :** तुमच्या ज्वलंत भावनेला, दुर्दम्य आशावादाला, प्रखर ध्येयनिष्ठेला आणि अपराजित चारित्र्याला या महिन्यातील अष्टमातील उग्र ग्रहस्थितीचे आव्हानच आहे ! अंतरिक्षातील विशाल तेजोगोल गुरू तुमच्या पाठीशी सदैव उभा आहे, हे आव्हान स्वीकारायला कचरू नका.

हे लक्षात ठेवा, परिस्थिती आणीबाणीची असली तरी, अपयश देणारी खासच नाही. वाढत्या खर्चाचा ताण वाढला तरी, अप्रतिष्ठेची भीती यत्किंचितही नाही. निर्धारनिष्ठेचे खडतर व्रत आचरणाऱ्या सिंह राशीच्या छाव्यांचा मार्ग रोखण्यात कोणातच हिंमत नाही. दुसरा पंधरवडा अधिक ताणाचा, दगदगीचा, धावपळ घडपडीचा जाणवेल. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. संयमाने वागलात तर अनारोग्याची भीतीही फारशी वाटेनाशी होईल. दि. ४ ते ९, १६ ते २२, २४ ते २७ या काली राजकीय क्षेत्रातील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील.

**कन्या :** तुमच्या प्रगतीची घोडदौड, सप्तमातील शनिमंगळादी ग्रहांमुळे रोखली जाईल. पावलोपावली अडीअडचणींना तोंड द्यावे लागेल. भागीदारीचे व्यवहार तर साफ कोसळतील. क्षणोक्षणी कौटुंबिक संघर्ष निर्माण व्हायला लागतील. नोकरी धंद्यांत वरिष्ठांची नाराजी अनुभवावी लागेल.

अगदी स्पष्ट सांगायचे झाल्यास निरुपायाने मला असे सांगणे भाग आहे की, या सबंध महिन्यात अंतरिक्षातील एकाही ग्रहाची सहानुभूती आपणांस लाभण्याची शक्यता नाही.

या वेळी तुमची सहनशक्ती कसाला लागेल. तुमचे कर्तृत्व, तुमची झुंझार प्रवृत्ती, तुमचा बुद्धिवाद या साऱ्यांची परीक्षाच आहे.

असे असूनही या दिव्यातून आपण निश्चितपणे बाहेर पडाल. परिश्रम खूप करावे लागतील, सारी शक्ती पणास लावून हेतुसिद्धीसाठी झगडावे लागेल.

दि. ५ ते ११, १९ ते २४, २७ ते ३० या काली आपले परिश्रम वाया जाऊ नयेत.

**तूळ :** गुरू एकादशस्थानी असूनही सध्याचे दिवस फारसे अनुकूल आहेत असे वाटू शकणार नाही. षष्ठस्थानी जमलेल्या अनेक ग्रहांच्या मनांत नमके काय आहे हे जरी ठामपणे सांगणे अशक्य असले तरी एवढे सांगणे शक्य आहे की, या वेळी जे जे घडेल ते ते अपेक्षेप्रमाणे चांगले असेलच असे मात्र नाही, या वेळी तुमचा प्रयत्नवाद निष्प्रभ ठरेल, तुमचे बुद्धिसामर्थ्यही फारसे उपयोगी पडेल असे वाटत नाही.

अशा वेळी काहीही विशेष न करण्यासारखा शहाणपणा नाही.

दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा, वाहन कोणत्याही क्षणी रुसेल, आखीव योजना फिसकटतील, नोकरचाकर बेभरवशी ठरतील. सांपत्तिक ताण प्रतिक्षणी वाढू लागेल, प्राप्ती थोडी घसरू लागेल. दि. ७ ते ११, १७ ते २१, २६ ते २८ आपले प्रयत्न थोडेफार कारणी लागतील याच काली.

**वृश्चिक :** शनिमंगळांसारखे अनेक स्फोटक ग्रह पंचमात–त्यांच्यापासून काही चांगल्या गोष्टींची अपेक्षा करण्यात अर्थ नाही. कौटुंबिक अनारोग्य, सांपत्तिक ताण, व्यावसायिक मतभेद इ. प्रकार निर्माण होण्याची शक्यता अधिक. दशमातील गुरू-मुळे एवढेच घडेल, की तुमच्या प्रतिष्ठेवर शिंतोडे उडू शकणार नाहीत.

२४ मार्चच्या गुरु–मंगळ त्रिकोणापासून सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल. स्थगित कार्यांना गती मिळेल याच कालापासून. औद्योगिक क्षेत्रात–यांत्रिक विभागात–वैद्यकीय व्यवसायात प्रगतीकडे पावले पडायला लागतील मार्चच्या अखेरच्या आठवड्यापासूनच.

आपले व्यावसायिक क्षेत्र बदलेल, नोकरीत अनपेक्षितपणे बदली होईल;

दि. ६ ते ९, ११ ते १४, २१ ते २७ या वेळी थोडेफार आपेक्षेप्रमाणे घडावे.

**धनू :** एकटा मंगळ जरी चतुर्थ स्थानी आला तरी मनुष्य प्रतिकूलतेच्या हल्ल्यांनी घायाळ होतो–आणि या वेळी तर आणखी २–३ ग्रह त्या मंगळाच्या सान्निध्यात येणार आहेत. अशा वेळी काय होईल हे सांगताच येणार नाही.

परिस्थिती स्फोटक आहे याची जाणीव ठेवून नितांत सावधगिरी बाळगली पाहिजे. अनारोग्य, सांपत्तिक ताण, राहत्या जागेच्या असह्य कटकटी, आणि नोकरी-धंद्यांतील पेचप्रसंग यांपैकी काही कदाचित् सर्वही गोष्टी घडून येण्याची शक्यता आहे.

न पेलण्यासारख्या जबाबदाऱ्या उचलण्याचे साहस करू नका. आणि प्रकृतीच्या बारीकसारीक तक्रारींकडेही दुर्लक्ष करू नका.

२४ मार्चच्या गुरुमंगळ त्रिकोणामुळे आपल्या पेचप्रसंगावर तोडगा सापडू शकेल.

ऐनवेळी अनेकांचे सहकार्य लाभू शकेल. स्थगित कार्ये गती घेऊ लागतील.

दि. ४ ते ७, १४ ते २५ या काली बऱ्याचशा गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडून याव्यात.

**मकर** : पराक्रमस्थानी श. म. रा. हे निसर्गाचे तुम्हांला वरदानच. इतके कर्तृत्व-संपन्न ग्रह पराक्रमात–अशी ग्रहस्थिती सबंध हयातीत एकदाच फक्त येऊ शकते. व्यवसायधंद्यात नोकरी–चाकरीत काहीतरी अलौकिक अनन्यसाधारण अघटित असे घडून यावे. मार्चचा मध्य काल या माझ्या विधानाचा आपणांस प्रत्यय आणून देईल.

बदलीबढतीचे योग येतील. नवे यशस्वी क्षेत्र हाती येईल. आपण आचरणात आणीत असलेले नवे तंत्र अपेक्षेबाहेर यशस्वी ठरू लागेल. प्रगत जीवनाचा आदर्श जगापुढे ठेवला जाईल. कला, साहित्य, प्रकाशन क्षेत्रांशी जर आपला संबंध असेल तर त्यामध्ये तुमच्या हातून काही भव्य दिव्य घडून येईल. यंत्रतंत्रविशारदांनाही या कालाइतका अनुकूल काल क्वचित्च प्रत्ययास येईल.

हे सारे दिवस खूपच घाईगर्दीचे धावपळीचे जाणवतील.

दि. ४ ते ७, १५ ते २४, २८ ते ३० या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** : अंतरिक्षातील बहुतेक सारे उग्र ग्रह तुमच्या धनस्थानी एकत्र येत आहेत. त्यांची झळ थोडीफार तरी बाधल्याशिवाय कशी राहील ?

सांपत्तिक अडचणीला सदैव तोंड द्यावे लागेल. हाती घेतलेली कामे योग्य मुदतीत पुरी करणे अशक्य होऊन बसेल, थोरामोठ्यांचे सहकार्य लाभण्याची आशा मावळू लागेल. दंत, नेत्र, मुखविकार याच वेळी उद्भवल्यामुळे साऱ्या योजना घरंगळू लागतील. कौटुंबिक वातावरण अप्रसन्न दिसू लागेल.

या वेळी एकच एक आशास्थान सप्तमस्थ गुरू २४ मार्चला गुरुमंगळचा त्रिकोण घडताच आशादायक वातावरण सर्वत्र दिसू लागेल.

प्रवास घडेल, इष्टमित्र मदतीचा हात पुढे करू लागतील. न होणारी कामे झटपट होऊ लागतील. या वेळी सामाजिक राजकीय क्षेत्रांत फारसा भाग घेऊ नका. दि. ४ ते ६, ८ ते १४, १६ ते २४ या काळी आपल्या प्रयत्नाला चांगले यश लाभू लागेल.

**मीन** : आजवर सहसा कधी न अनुभवलेली अशी चमत्कारिक वेळ सध्या तुम्हांला अनुभवावी लागेल. श. रा. मं. र. साऱ्याच अनिष्ट ग्रहांचे तुमच्या राशीतून संचलन घडत आहे. मुख्यतः तुमच्या मनस्थितीवर आणि आरोग्यावर त्यांचा रोख दिसतोय. परिस्थितीचा अंदाज घेऊन कालाची पावले ओळखून वागायला हवे. वाटेल ते करण्याचा आणि मनाला येईल तसे वागण्याचा हा कालच नव्हे !

प्रकृतीच्या बारीकसारीक तक्रारींकडेही दुर्लक्ष करून भागण्यासारखे नाही. नैराश्य, उदासीनता, अपेक्षाभंग असले काही प्रकार या कालात उद्भवण्याची शक्यता फार आहे व्यापारधंद्यांत साहस करणे हितावह ठरणार नाही. दूरचा प्रवास करण्याने अपेक्षा सफल होणार नाहीत. मंगलकार्याचे पुढे ढकला.

दि. ५ ते ९, १२ ते १४, २२ ते २८ या कालात थोडेफार यश लाभावे. ○

अल्पावधीत लोकप्रिय झालेली

# स्वस्तिक

## पादत्राणे



मीना

आकर्षक रंग
लेटेस्ट डिझाईन्स
टिकण्यास मजबूत



राज



वंदिनी

**स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि., पुणे ३.**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No M H-64


# दि कोल्हापूर

# शुगर मिल्स लिमिटेड,

**कोल्हापूर**

महाराष्ट्राच्या साखर कारखानदारीच्या क्षेत्रातील
दि कोल्हापूर शुगर मिल्सची वैशिष्टयपूर्ण प्रगती—

*या अभिमानास्पद प्रगतीचे काही ठळक विशेष*

✦ १९३४ साली साखरेच्या उत्पादनास सुरुवात. ✦ १९४४ मध्ये डिस्टिलरी सुरू होऊन स्पिरिटच्या उत्पादनास सुरुवात झाली. ✦ १९६०-६१ साली उत्पादन शक्तीत महाराष्ट्रात अग्रेसर ठरलेल्या या कारखान्याने साखर उत्पादनाचा उच्चांक गाठला, ✦ १९६२-६ साली महाराष्ट्रात अग्रेसर राहून भारतामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे साखर-उत्पादन केले. ✦ अॅब्सोल्यूट अल्कोहोलचे महाराष्ट्रातील एकमेव उत्पादक.

*आणि आता प्रगतीचा नवा टप्पा-*

कोल्हापुरात अॅसेटिक अॅसिडच्या, ब्युटिल अल्कोहोल व ब्युटिल अॅसिटेटच्या उत्पादनास सुरुवात झाली आहे.

या कारखान्यातून प्रथम श्रेणीची उत्तम, शुभ्र, कणीदार साखर, डिनेचर्ड स्पिरिट, फर्निचरसाठी उपयुक्त असे फ्रेंच पॉलिश व ऑईल मिल विभागातून येशेल तेल यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन व पुरवठा केला जातो.

आमचा माल महाराष्ट्र राज्य, म्हैसूर राज्य, भारत सरकारचे संरक्षण खाते व भारतात इतरत्रही पुरविला जात असून मालाच्या चांगुलपणाबद्दल सर्वत्र ख्याती आहे.

अद्यावत सुधारणा, कलात्मक रचना व अद्यावत यंत्रसामग्री हे आमच्या कारखान्याचे आगळे वैशिष्टय आहे.

मॅनेजिंग एजंटस्
**दि युनायटेड एजन्सीज प्रायव्हेट लिमिटेड,**
कोल्हापूर.